क्रमांक :- २

महाराष्ट्र विधानसभा

पत्रक भाग दोन

सोमवार, दिनांक १७ जानेवारी, २०२२ / पौष २७, १९४३ शके

लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

२. सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते कि, सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर,२०२१ रोजी संस्थगित झाले. उक्त दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या एकूण ३६ स्वीकृत लक्षवेधी सुचनांच्या जोडपत्रामधील ६ लक्षवेधी सूचनांची निवेदने त्याचदिवशी मा.सदस्यांकरिता राखून ठेवण्यात आलेल्या टपालखणाद्वारे वितरीत करण्यात आली असून उर्वरित एकूण ३१ निवेदने विभागाकडून प्राप्त होणे प्रलंबित होती.

आता प्रलंबित स्वीकृत लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी **एकूण १५ निवेदने** विभागाकडून प्राप्त झाली असून यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

विधान भवन,
मुंबई
दिनांक : १७ जानेवारी, २०२२.

राजेन्द्र भागवत
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

३. संगणक कक्ष (website.)

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२१ चे हिवाळी अधिवेशन

सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (~~बच्चू~~ दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुभाष देशमुख, राजेश पवार, राम कदम, राणाजगजीतसिंह पाटील, मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक, अमित साटम, कुणाल पाटील, नानाभाऊ पटोले, सुरेश वरपुडकर, पृथ्वीराज चव्हाण, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. अमीन पटेल, विकास ठाकरे, कुमारी प्रणिती शिंदे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री बळवंत वानखडे, अमित झनक, सुभाष धोटे, हिरामण खोसकर, मोहनराव हंबर्डे, जितेश अंतापूरकर, माधवराव पवार, धिरज देशमुख, झीशान सिद्दिकी, विक्रमसिंह सावंत, ऋतुराज पाटील, रणजीत कांबळे, अबु आजमी, राहूल कुल, जयकुमार गोरे, संजय केळकर, किसन कथोरे, चिमणराव पाटील, प्रताप सरनाईक, वि. स. स.

"राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे निदर्शनास येणे, दिनांक १० सप्टेंबर, २०२१ रोजी मुंबईतील साकीनाका भागात ३४ वर्षीय महिलेवर अमानुष लैंगिक अत्याचार केल्यामुळे उपचारादरम्यान सदर महिलेचा मृत्यू होणे, या घटनेतील आरोपीचे क्रौर्य पाहून अवघे राज्य सुन्न होणे, डोंबिवलीतील एका घटनेमध्ये अल्पवयीन मुलीचे ३० जणांकडून लैंगिक शोषण झाले असल्याचे निदर्शनास येणे, ठाणे शहरातदेखील महिला सुरक्षितेसंदर्भात अनेक प्रश्न उद्भवणे, माहे जानेवारी ते जुलै या सात महिन्यांच्या कालावधीत एकट्या मुंबईत बलात्काराचे ५५० गुन्ह्यांची तर विनयभंगाच्या सुमारे ११०० गुन्ह्यांची नोंद झाल्याचे उघड होणे, महिलांवरील अत्याचाराच्या प्रकरणात दोषसिद्धीचे प्रमाण राज्यात केवळ १५.३ टक्के म्हणजे देशाच्या प्रमाणापेक्षा निम्मे असणे, गुन्हेगारांना पोलीसांचा धाक राहिला नसल्याचे स्पष्ट होणे, राज्यातील महिलांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यासाठी पोलीसांनी व शासनाने विशेष प्रयत्न करण्याची गरज, त्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

मा. मंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

साकीनाका, मुंबई येथे ३२ वर्षीय महिलेवर लैंगिक अत्याचार करून तिचा धारदार शस्त्राने खून केल्याची घटना घडली आहे. याबाबत, साकीनाका पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. ९३७/२१, भा.दं.वि. कलम ३०२, ३७६ (२) (एम), ३७६(अ), अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ चे कलम ३ (१) (डब्ल्यू), ३ (२) (व्ही), महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस दिनांक १०.०९.२०२१ रोजी लगेच अटक करण्यात आली असून, सदर आरोपीविरुध्द मा. न्यायालयात दिनांक २८.१०.२०२१ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

अतिप्रसंग करताना काढलेला व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी डोंबिवली परिसरात राहणा-या १५ वर्षाच्या पिडीत मुलीला देऊन वारंवार सामुहिक केल्याबाबत मानपाडा पोलीस स्टेशन येथे दिनांक २३.०९.२०२१ रोजी गु.र.क्र. ४९९/२०२१, भा.दं.वि. कलम ३७६, ३७६ (२) (एन), ३७६ (३), ३७६ (ड) (अ), पोक्सो कलम ४, ६, १०, माहिती तंत्रज्ञान अधिनियमाचे कलम ६७ (अ) (ब) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात २९ आरोपींना अटक करण्यात आली आहे आणि ४ विधिसंघर्षित बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले असून एका आरोपीचा शोध सुरू आहे.

मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत जानेवारी ते जुन, २०२१ या कालावधीत बलात्काराचे एकूण ५५० गुन्हे आणि विनयभंगाचे १०९८ गुन्हे दाखल झालेले आहेत. नॅशनल क्राइम रेकोर्ड ब्युरोने सन २०२० मध्ये प्रकाशित केलेल्या अहवालानुसार महिलांवरील अत्याचाराच्या खटल्यांमधील राज्याचा दोषसिध्दीचा दर १५.३ आहे. आरोपी निर्दोष सुटण्याच्या कारणामध्ये फिर्यादी फितूर होणे, साक्षीदार फितूर होणे, संमतीचे गुन्हे असणे, फिर्यादीकडून गुन्हा विलंबाने दाखल करणे, साक्षीदार न मिळणे, सुनावणीस विलंब होणे, इ. कारणे आहेत.

बलात्कार, विनयभंग, छेडछाड, ॲसिड हल्ला या महिलांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांमधील आरोपींना शिक्षा होण्याच्या दृष्टीने प्रचलीत कायद्यात सुधारणा करून संसदेने फौजदारी कायदा (सुधारणा) अधिनियम, २०१८ पारित केला आहे.

अल्पवयीन पिडीत मुली व महिलांविरूध्दच्या गुन्ह्याचा तपास विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी आयुक्तालय स्तरावर संबंधित पोलीस उप आयुक्त यांनी तर जिल्हा स्तरावर संबंधित पोलीस अधिक्षक यांनी वेळोवेळी आढावा घेण्याबाबत शासनाच्या दिनांक ०९.०७.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

महिला व बालकांवरील लैंगिक अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्याबाबतच्या उपाययोजना करण्याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून दिनांक ०२.०८.२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व पोलीस घटकांना सूचित करण्यात आले आहे. भारतीय दंड सहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ व लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ हे अधिनियम महाराष्ट्र राज्यात लागू असताना त्यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता सन २०२० चे विधानसभा विधेयक क्र. ५१ शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक हे दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात आले असून,

येत्या हिवाळी अधिवेशनामध्ये संयुक्त समितीचा अहवाल विधानमंडळ सभागृहासमोर सादर करण्यात येणार आहे.

महिलांवरील अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी पोलीस ठाणे स्तरावर निर्भया पथक, पोलीस दीदी, परिणामकारक गस्त, प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला कक्ष, महिला दक्षता समितीची स्थापना करण्यात आली आहे. बृहन्मुंबई शहरातील निर्मनुष्य जागांचे सुरक्षा ऑडीट करण्यात आले असून, बृहन्मुंबई ज्या निर्मनुष्य जागा आहेत अशा ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, प्रकाश व्यवस्था करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका, रिलायन्स एनर्जी, बीएसईएस यांच्या एकत्रितपणे उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

लक्षवेधी सूचना क्र.०८

सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री. रवि राणा, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"नागपूर येथील खान सुरक्षा निर्देशक नागपूर क्षेत्र-१ या कार्यालयाने अमरावती तालुक्यातील कोणत्याही खदानीला डीप होल ब्लास्टिंग, विस्फोटक वापरण्याची परवानगी दिलेली नसल्याची गंभीर बाब कार्यालयाचे पत्र क्र. २०२१/६१९, दिनांक १७ डिसेंबर, २०२१ रोजी नुसार उघडकीस येणे, असे असतानाही अमरावती जिल्ह्यातील मौजे मासोद येथील खदानिला परवानगी नसतानाही खदान संचालक हे जिलेटीनच्या काड्या वापरुन अवैध्दरित्या गौण खनिज काढत असून शासनाच्या नियमांचे उल्लंघन करीत असल्याची बाब उघडकीस येणे, मोठ्या प्रमाणात जिलेटीनच्या कांड्या वापरुन मशीनद्वारे ब्लास्टिंग करत असणे, यामुळे आजूबाजूच्या घरांना तडे तसेच त्यांच्या आरोग्यावर देखील परिणाम होणे, खदान संचालक यांनी जवळपास १० करोड रुपयांच्या गिट्टीचा विनापरवाना स्टॉक केलेला असणे. या परिसरातील बोअर, विहिरीचे पाणी आटून ते सर्व पाणी त्या ठिकाणी असलेल्या खोल खदाणी मध्ये जमा होत असल्यामुळे निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा खणीकर्म अधिकारी अमरावती, मंडळ अधिकारी तलाठी व संबंधित पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी मासोद परिसरातील गिट्टी खदानवर छापा मारला असता उपरोक्त प्रकार उघडकीस येणे, त्यामुळे जिल्हाधिकारी अमरावती यांचे आदेशानुसार अप्पर जिल्हादंडाधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रमांक १६७८/२०२१, दिनांक २० डिसेंबर २०२१ रोजीच्या पाहणी अहवाल पोलीस आयुक्त यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवणे, खदान मालक तसेच संबंधितावर गुन्हा दाखल करुन अटक करण्याची होत असलेली मागणी, शासनाने या संदर्भात करावयाची कारवाई व उपाययोजना."

मा. मंत्री (महसूल) श्री. बाळासाहेब थोरात यांचे निवेदन

मौजे मासोद व मौजे परसोडा ता. जि. अमरावती येथील खदानीमधून मोठ्या क्षमतेचे विस्फोटक वापरून ब्लास्टींग करण्यात येत असल्याने येथील घरांना जबर धक्का बसत असून घरांना भेगा पडून सदर भागातील पाण्याची पातळी खाली जात आहेत अशा आशयाच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे सादर केल्या.

सदर तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करीता अपर जिल्हादंडाधिकारी अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली दि.०८.११.२०२१ रोजी संयुक्त समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीने मौजा परसोडा व मौजा मासोद येथील खाणपट्याची पाहणी करुन जिल्हाधिकारी अमरावती यांना दि.१७.१२.२०२१ रोजी अहवाल सादर केला. सदर अहवाल जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि.२०.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपर जिल्हादंडाधिकारी, अमरावती; वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण अमरावती; उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अमरावती; जिल्हा खनिकर्म अधिकारी, अमरावती; पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांना त्यांच्या विभागाशी संबंधित मुद्यांवर

कारवाई करण्याबाबत कळविले आहे. तसेच ब्लास्टींग संदर्भातील तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याकरिता जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि.२१.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये नागपूर येथील खाण सुरक्षा निर्देशक नागपूर क्षेत्र-१ या कार्यालयास कळविले होते. त्यांनी सदर खाणीसोबतच इतर ५ खाणींची देखील तपासणी दि. २३ व २४ डिसेंबर, २०२१ रोजी पाहणी केली असुन पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींचे अनुषंगाने मोक्यावरच संबंधित खाणपट्टा धारक यांना नोटीस बजावुन ब्लास्टींग संदर्भात खणीपट्टा मंजूरीतील खाणकाम आराखड्यातील नमूद केलेल्या Blasting Pattern नुसार Blasting होत नसल्याचे आढळून आल्यामुळे त्या परिसरातील एकूण ६ खाणीतील खाणकाम पुढील आदेश होईपर्यंत निलंबित केलेले आहे. नागपुर येथील खान सुरक्षा निर्देशक नागपुर क्षेत्र-१ या कार्यालयाकडून नियमानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

तसेच संबंधित खाणपट्टाधारक यांनी मंजूरी आदेशातील अटी व शर्तीचे तसेच पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तींचे पालन न केल्याने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि.२२.१२.२०२१ रोजीच्या नोटीसीन्वये खुलासा सादर करण्याबाबत संबंधितास कळविण्यात आले.

मौजा परसोडा येथील गट नं.२०२ मधील ०.७६ हे. आर व गट नं. २०३ मधील ०.७१ हे. आर मध्ये गौण खनिज साठवणूकीकरिता जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि.२६.०७.२०२१ रोजी परवाना देण्यात आलेला होता. सदर परवानानुसार साठवणूक केलेल्या गौण खनिजाची तपासणी व मोजणीची कार्यवाही तहसिलदार, अमरावती यांचेकडून सुरू आहे.

वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विभाग, अमरावती यांच्या दि.१.०९.२०२० रोजीच्या पत्रान्वये मौजा परसोडा गावामध्ये पाठीमागील १० वर्षामध्ये टंचाई आराखड्यामध्ये शिफारस झालेली नसून टँकरने सुध्दा पाणीपुरवठा केला नसल्याचे तसेच भूजलातील पाणी पातळीमध्ये घट झाली नसल्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, अमरावती यांना सादर करण्यात आला आहे.

****

H/532-19

लक्षवेधी सूचना

सर्वश्री. प्रकाश सोळंके, बाळासाहेब आजबे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना

"बीड जिल्ह्यात सन २०१८ ते २०२१ या कालावधीत देवस्थान, दर्गा, मस्जिद, इनामी आशा स्वरुपाच्या हजारो एक्कर जमीन तत्कालीन उपजिल्हाधिकारी (भूसुधार), बीड यांनी खाजगी व्यक्तींच्या नावे करण्याचे नियमबाह्य आदेश पारीत करणे, तसेच यामधील काही प्रकरणामध्ये मा.न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करुन आदेश पारीत करणे, त्याचप्रमाणे वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनी खोटे कागदपत्रे तयार करुन खाजगी व्यक्तींच्या नावे हस्तांतरीत करणे, या सर्व जमिनी शासनाच्या महसूल अधिनियम सन २०१५ मधिल तरतूदींचे उल्लंघन करुन अधिकारी व खाजगी भूमाफीयांनी हजारो कोटी रुपयांचा गैरव्यवहार करणे, शासनाचा शेकडो कोटी रु. चा महसूल बुडवणे, दरम्यान वक्फ बोर्डाच्या जमिनी संदर्भात बीड जिल्ह्यात गुन्हा क्रं.२०५/२०२१ (पो.स्टे.आष्टी), गुन्हा क्रं.२४५/२०२१ (पो.स्टे.अंभोरा), गुन्हा क्रं.२७०/२०२१ (पो.स्टे.आष्टी) नुसार तत्कालीन दोन उपजिल्हाधिकारी व खाजगी व्यक्ती विरुध्द फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल होणे, दरम्यान या सर्व जमिनीच्या संदर्भात विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी शासनास अहवाल देणे, हिंदु देवस्थान, इनामी जमिनी संदर्भात संबंधित दोषी अधिकारी व खाजगी व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल करण्याची मागणी स्थानिक नागरीक, संघटना व लोकप्रतिनिधीने शासनास व प्रशासनाकडे करणे, परंतू याकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होणे, यामुळे बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरीकांमध्ये पसरलेला तिव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री.बाळासाहेब थोरात, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

बीड जिल्ह्यातील देवस्थान इनाम, दर्गा, मस्जिद, इनामी जमिनी संदर्भात प्राप्त विविध तक्रारींच्या प्राथमिक चौकशीअंती तत्कालीन उपजिल्हाधिकारी, (सामान्य) भूसुधार बीड यांचेकडून काही न्यायालयीन प्रकरणांमध्ये आदेश पारित केले असल्याची बाब सकृतदर्शनी निदर्शनास आली आहे. सदर गैरव्यवहारांच्या अनुषंगाने तत्कालीन दोन उपजिल्हाधिकाऱ्यांविरुध्द गुन्ह्यांची नोंद झाली असून या प्रकरणांत पोलीस प्रशासनाकडून तपासाची कार्यवाही सुरु आहे.

तसेच सदर जमीन गैरव्यवहारासंदर्भात विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी शासनास सादर केलेल्या प्राथमिक अहवालानुसार तत्कालीन उपजिल्हाधिकारी, (सामान्य) भूसुधार बीड यांनी अधिकाराचा गैरवापर करुन बेकायदेशीर आदेश पारीत केले असल्याचा निष्कर्ष नमूद करुन त्यांचेविरुध्द कारवाई करण्याची

शासनास शिफारस केली आहे. तसेच, जिल्हाधिकारी, बीड यांनी देखील एका उपजिल्हाधिकाऱ्यांचे निलंबनासंदर्भातील शासनास सादर केलेल्या प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

बीड जिल्हयातील देवस्थान इनाम व वक्फ जमिनींच्या गैरव्यवहारप्रकरणी शासनाकडे तसेच, विभागीय आयुक्त, औरंगाबाद व जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे देखील तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारी या सर्वसाधारणपणे देवस्थान इनाम व वक्फ जमिनीसंदर्भातील आर्थिक गैरव्यवहार, या जमिनी बेकायदेशीररित्या खालसा करणे, देवस्थान इनाम व वक्फ जमिनींच्या अभिलेखावर त्रयस्थ लोकांची नांवे बेकायदेशीररित्या लावणे, देवस्थान इनाम जमिनीची नजराणा रक्कम न भरणे व नवीन अभिन्यास न करता प्लॉटची विक्री करणे अशा स्वरुपाच्या आहेत. सदर प्राप्त तक्रारींचे गांभिर्य विचारात घेऊन दि.२३.११.२०२१ रोजीच्या शासनपत्रान्वये सदर तक्रारींची अपर जिल्हाधिकारी यांचे समितीमार्फत चौकशी करुन 3 महिन्यात चौकशी अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी याप्रकरणी, कामाचा व्याप व प्रकरणांची संख्या विचारात घेवून बीड जिल्ह्यातील देवस्थान इनाम जमिनी व वक्फ जमिनीच्या गैरव्यवहारांसंदर्भात प्राप्त तक्रारींची सखोल चौकशी करण्यासाठी १) अपर जिल्हाधिकारी, बीड व २) अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांची व्दिसदस्यीय समिती नियुक्त केली असून सदर समितीमार्फत चौकशी करुन अहवाल शासनास सादर करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

याशिवाय, विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दि.१२.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये औरंगाबाद विभागातील सर्व जिल्ह्यातील देवस्थान इनाम व वक्फच्या मालकीच्या जमिनीच्या अधिकार अभिलेखांची माहिती संकलित व पडताळणी करण्याच्या सूचना विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत.

****

एच ५३३ - १अ

नगर विकास विभाग **महाराष्ट्र विधानसभा** **लक्षवेधी सूचना**

सन २०२१ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

श्री.मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" मालेगांव (जि.नाशिक) महानगरपालिकांतर्गत कोरोना काळात पुरविण्यात आलेली औषधे व अत्यावश्यक साहित्य खरेदी करतांना कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे नुकतेच माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये उघडकीस येणे, मालेगाव महानगरपालिकेने औषधे व साहित्याची बिले काढतांना प्रत्यक्षात औषधे व साहित्य खरेदी केलेले नसतांना खोटी बिले दाखवून व काही बिलांमध्ये वाढ करुन तर काही ठिकाणी फक्त कागदे रंगवून बिले काढून भ्रष्टाचार केल्याचे निदर्शनास येणे, सदर भ्रष्टाचारासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींकडे अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या असणे, सदर भ्रष्टाचाराकडे शासनाचे जाणीवपुर्वक होत असलेले दुर्लक्ष, याबाबत सखोल चौकशी करुन दोषींविरुध्द कठोर कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

मालेगाव महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोविड-१९ या साथरोगाचा प्रादुर्भाव सुरु झाल्यानंतर पहिला कोरोनाबाधित रुग्ण दि.०८/०४/२०२० रोजी आढळला होता. कोरोनाच्या पहिल्या लाटेतील महाभयंकर परिस्थितीत महानगरपालिकेकडील औषधसाठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याने, अशा आपत्कालिन परिस्थितीत औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध असणे गरजेचे व अनिवार्य होते.

मालेगाव महानगरपालिका कार्यक्षेत्रात दिवसेंदिवस कोरोना बाधित व संशयित रुग्णांची संख्या वाढत असल्याने, आरोग्य संचालनालयाच्या पथकाने मालेगाव महानगरपालिकेच्या कोविड रुग्णालयांना भेट दिली असता रुग्णालयांसाठी आवश्यक औषधे व इतर वैद्यकीय साहित्यांबाबत आढावा बैठक घेतली. सदर बैठकीत त्यांनी वाढती रुग्णसंख्या पाहता योग्य ते नियोजन करणे व आवश्यक औषध, साहित्यांची खरेदी करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती अंतर्गत असलेल्या योजनेतून सुमारे एक ते दोन कोटी रुपये निधी प्राप्त होणार असल्याचे बैठकीत सांगितले. त्यानुसार निधी मंजुर होण्याचे अधिन राहून ई-निविदा मागविण्याची प्रक्रिया सुरु करण्याबाबत निर्देश दिले होते.

शासन अधिसूचना दिनांक १४ मार्च, २०२० नुसार महानगरपालिका क्षेत्रासाठी कोविड-१९ या साथीचे नियंत्रणासाठी महापालिका आयुक्तांना सक्षम प्राधिकारी घोषित करण्यात आलेले आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ६७(३) अन्वये आयुक्त यांना अशा परिस्थितीमध्ये खर्च

करण्याचे व अधिनियमाचे प्रकरण ५, नियम (२)(२) नुसार स्थायी समितीला आयुक्तांना निविदा न मागविता संविदा करण्यास प्राधिकृत करण्याचे अधिकार प्रदान केलेले आहेत. त्यानुसार स्थायी समितीने ठराव क्र.३९१, दि.१८/०५/२०२० अन्वये महानगरपालिका प्रशासनाच्या अलगीकरण व विलगीकरणाची व्यवस्था राबविण्यासाठी येणाऱ्या खर्चास व खर्च करतांना वस्तूंचे व कामाचे दर हे विनानिविदा तथापि इतर शासकीय/निमशासकीय/स्थानिक संस्था यांच्याकडील समान व्यवस्थेसाठी जे वस्तूंचे दर असतील त्यापेक्षा कमी अथवा त्याप्रमाणे दर वापरुन संविदा करण्यास मान्यता प्रदान केली असून, त्यावर होणाऱ्या खर्चास तात्पुरत्या स्वरुपात महानगरपालिकेच्या विविध योजनातील निधीतून खर्च करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार, मालेगाव महानगरपालिकेने कोविड-१९ अंतर्गत राज्य आपत्ती व्यवस्थापनांतर्गत रुग्णांच्या उपचारासाठी उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने आवश्यक औषध साठा व इतर साहित्य यांच्या खरेदीसाठी शासनाच्या ई-निविदा पोर्टलवर निविदा प्रसिध्द केली होती. सदर ई-निविदेत सर्वात कमी दराचे प्राप्त निविदाधारक यांच्याकडून प्राप्त दरानुसार, जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे जिल्हा नियोजन समिती अंतर्गत दोन कोटी निधी मिळण्याबाबत तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत प्रस्ताव पाठविण्यात आला होता. सदर प्रस्तावास जिल्हाधिकारी, नाशिक यांच्यामार्फत दिनांक २०/०३/२०२१ रोजी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून, त्यानुसार स्थायी समिती ठराव क्र.४९३, दि.२३/०३/२०२१ अन्वये प्राप्त दरास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार निविदा प्रक्रियेतील पात्र निविदाधारकास महानगरपालिकेमार्फत पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. मालेगाव महानगरपालिकेने नियमोचित व विहित प्रक्रियेचा अवलंब करुन कोविड काळात औषधे व साहित्यांची खरेदी केलेली आहे. यामध्ये कुठल्याही प्रकारे भ्रष्टाचार झाल्याची साशंकता दिसून येत नसल्याचे आयुक्त, मालेगाव महानगरपालिका यांनी कळविले आहे.

****

H/515-19

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

सन २०२१ तृतीय (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत ~~(बच्चू)~~ दादा पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुभाष देशमुख, राजेश पवार, राम कदम, राणा जगजीतसिंह पाटील, सुनील राणे, श्रीमती माधुरी मिसाळ, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री सुनिल प्रभू, मंगेश कुडाळकर, डॉ बालाजी किणीकर , सर्वश्री गणपत गायकवाड, किसन कथोरे, चिमणराव पाटील , अजय चौधरी , संतोष दानवे, राहूल कुल, जयकुमार गोरे, अबू आजमी, प्रताप सरनाईक, किशोर जोरगेवार मा. विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी पुढील प्रमाणे आहे :-

---

"कोरोनाचा उतपरिवर्तित विषाणू ओमिक्रोनचा शिरकाव राज्यात झाल्याने पुन्हा एकदा भीतीचे वातावरण निर्माण झालेले असणे, राज्यात ओमिक्रोनचे २८ रुग्ण आढळून येणे, ओमिक्रोन विषाणूंची संख्या देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात जास्त असणे , कोरोनाचे निर्बंध नुकतेच शिथिल करण्यात आलेले असणे, मास्क न लावता सार्वजनिक ठिकाणी वावरण्याची जनतेची प्रवृत्ती निदर्शनास येणे, त्यामुळे कोविड अनुरूप वर्तनाची अंमलबजावणी होईल याबाबत दक्षता घेण्याची आवश्यकता असणे, एकीकडे ओमिक्रोन रुग्णांची संख्या वाढत असताना सरसकट शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतल्यामुळे पालकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होणे, कोरोनाच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील मृतांची संख्या देशात सर्वाधिक असणे , कोरोना मृतांच्या नातेवाईकांना द्यावयाच्या आर्थिक सहाय्यासाठी आलेल्या अर्जांची संख्या पाहता कोरोना मृतांच्या आकडेवारी विषयी संभ्रम निर्माण होणे, आरोग्य विभागाला पैसा कमी पडू देणार नाही असे कोरोना काळात गेल्या दोन वर्षात सरकारकडून सांगण्यात येणे, मात्र प्रत्यक्षात आरोग्य विभागाकडे रुग्णालयातील अत्यावश्यक कामांसाठीही पुरेसा निधी दिला न जाणे, आरोग्य विभागाने वित्त विभागाकडे केलेल्या निधीच्या मागणीमध्ये ५०% टक्के कपात करण्यात आलेली असणे, त्यामुळे वीज बिले, पाणीपट्टी, माता बालकांच्या आहाराचे पैसे , वाहनचालकांचे पगार, कंत्राटी सुरक्षा रक्षकांचे पगार यासारख्या अत्यावश्यक बाबींसाठीही आरोग्य विभागाकडे पैसा उपलब्ध नसल्याची बाब उघड होणे अशा स्थितीत कोरोनाची लढाई कशी लढायची असा प्रश्न आरोग्य कर्मचाऱ्यांपुढे निर्माण होणे , शक्य तितक्या माध्यमातून कोरोनासाठी जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळण्याची आवश्यकता असणे , कोरोनाची लढाई प्रभावीपणे लढण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. श्री. राजेश टोपे, मंत्री सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण यांचे निवेदन

कोरोना विषाणूमध्ये वारंवार उत्परिवर्तन (म्युटेशन) होते. हा त्याच्या जीवनक्रमाचा नैसर्गिक भाग आहे. आजपर्यंत या विषाणूचे अल्फा, बीटा, डेल्टा असे महत्वपुर्ण व्हेरिएंट (उपप्रकार) आढळले आहेत. दिनांक २४ नोव्हेंबर, २०२१ रोजी दक्षिण आफ्रिकेने ओमिक्रॉन हा व्हेरिएंट आढळल्याचे घोषित केले. जागतिक आरोग्य संघटनेने ओमिकॉन हा व्हेरिएंट ऑफ कन्सर्न (चिंताजनक व्हेरिएंट)

म्हणुन घोषित केले आहे. दिनांक २२ डिसेंबर, २०२१ पर्यंत राज्यात ओमिक्रॉन व्हेरिएंटचे ६५ रुग्ण आढळले आहेत. त्याचा जिल्हावार तपशील पुढील प्रमाणे -

अ.क्र.	जिल्हा/मनपा	आढळलेले एकूण ओमिक्रॉन रुग्ण
१	मुंबई	३०*
२	पिंपरी चिंचवड	१२
३	पुणे ग्रामीण	७
४	पुणे मनपा	३
५	सातारा	३
६	कल्याण डोंबिवली	२
७	उस्मानाबाद	३
८	बुलढाणा	१
९	नागपूर	१
१०	लातूर	१
११	वसई विरार	१
१२	नवी मुंबई	१
एकूण		६५
* यातील २ रुग्ण कर्नाटक आणि केरळ तर प्रत्येकी छत्तीसगड, गुजरात, जळगाव, ठाणे आणि औरंगाबाद येथील आहे. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील सर्वेक्षणात आढळले आहेत.		

ओमिक्रॉन विषाणुचा पार्श्वभूमीवर राज्यात पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

- <u>सर्वेक्षण गतिमान करणे :</u>

  सध्या राज्यात विमानतळावर आणि क्षेत्रिय पातळीवर आंतरराष्ट्रीय प्रवाशांचे युध्दपातळीवर सर्वेक्षण करण्यात येत असून, पॉझिटिव्ह नमुने जिनोमिक तपासणीसाठी पाठविण्यात येत आहे.

- <u>आंतराष्ट्रीय विमानतळावर तयारी :</u>

  राज्यातील मुंबई, पुणे व नागपूर या तिन्ही विमानतळावर आंतरराष्ट्रीय प्रवाशांची तपासणी करण्यात येत आहे. अशा प्रवाशांना विलग करण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.

- <u>प्रयोगशाळांची सिध्दता :</u>

  राज्यातील ५७६ प्रयोगशाळांमार्फत आरटीपीसीआर तपासण्यामुळे जास्तीत जास्त तपासण्या होत आहेत. तसेच जनुकीय तपासणीसाठी राज्यात ६ प्रयोगशाळा कार्यरत आहेत. याशिवाय राज्याने सी.एस.आय. आर. सोबत करार केल्यामुळे जनुकीय तपासणी अधिक प्रमाणामध्ये करणे शक्य झाले आहे.

- <u>लसीकरण :</u>

  नवीन व्हेरियंटच्या पार्श्वभूमीवर राज्यातील लसीकरणाचा वेग वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. ज्यांनी अद्याप दुसरा डोस घेतलेला नाही . त्यांचे लसीकरण

त्वरेने पुर्ण व्हावे , यासाठी लोकप्रबोधन केले जात आहे . तसेच लसीकरण न झालेल्या नागरिकांपर्यंत पोहचण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

- सार्वजनिक आरोग्यासंबंधित उपाययोजना :

  कोविड अनुरूप वर्तन सुनिश्चित करण्यासाठी कडक नियम लागू केले गेले आहेत.

- आरोग्यसेवांची तयारी:

  नवीन व्हेरीयेट आणि तिसऱ्या लाटेची शक्यता गृहीत धरून राज्य शासन त्यादृष्टीने प्रयत्न आहे. रुग्णालयीन खाटा, ऑक्सिजनची उपलब्धता, ऑक्सिजन खाटा, आयसीयु सुविधा, व्हेंटीलेटर्स तसेच बालरुग्णांसाठी योग्य सुविधा यांचे सूक्ष्म नियोजन राज्य शासनाद्वारे करण्यात येत आहे. ही तयारी जिल्हयाच्या पातळीवर स्थानिक गरजेनुसार आवश्यकता आधारावर केली जात आहे.

- आरोग्य शिक्षण:

  नवीन व्हेरीयंटच्या अनुषंगाने करण्यात येणारी कार्यवाही आणि याविषयी सार्वजनिक आरोग्या संबंधित माहिती लोकांपर्यंत पोहचवणे आणि त्याबाबत लोकांच्या जबाबदारी बाबत जनतेला अवगत करणे, हे काम विविध माध्यमातून करण्यात येत आहे. राज्यातील ओसरत जाणारी दुसरी लाट , कोविड विषाणूचा मुलांना असणारा कमी धोका या पार्श्वभूमीवर राज्यातील शाळा सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्या संदर्भातील सविस्तर मार्गदर्शक सूचना सर्वांना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

- कोविड मृतांच्या नातेवाईकांना अर्थसहाय्य :

  दि. ९ मार्च, २०२० ते २० डिसेंबर, २०२१ या कालावधीत राज्यातील एकूण १,४१,३५३ कोविड मृत्यु झाले आहेत. कोविड मृतांच्या नातेवाईकांना / कुटुंबियांना प्रत्येकी ५० हजार रुपये अर्थसहाय्य देण्याची प्रक्रिया मदत व पुर्नवसन विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या समन्वयाने सुरु आहे.

  दि. २६ नोव्हेंबर, २०२१ च्या महसुल आणि वन विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार या संदर्भात सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत . या शासन निर्णयानुसार केवळ कोविड प्रयोगशाळा चाचणी पॉझिटिव्ह असणारे रुग्णच नव्हे तर ज्यांचे क्लिनिकल निदान कोविड असे करण्यात आले आहे असे सर्वजण या आर्थिक सहाय्यासाठी पात्र ठरणार आहेत. त्यानुसार अर्थसहाय्य प्रदान करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

- आरोग्य सेवाकरिता उपलब्ध अनुदान/निधी :

  सन २०२१-२०२२ करिता वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य अंतर्गत नियमित अनुदान स्वरुपात वेतनेतर प्रयोजनासाठी रुपये ३५२.४८ कोटी मंजुर करण्यात आलेले आहेत. कोविड उपाययोजनेसाठी निधी अपुरा पडू नये याकरिता पुरवणी मागणी अंतर्गत रुपये ११२२.४३ कोटी इतकी रक्कम मंजुर करण्यात आलेली आहे . त्यापैकी ५४९.५० कोटी इतक्या रक्कमेच्या खरेदीस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. खरेदीची कार्यवाही

सुरू आहे. याशिवाय राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तसेच राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षा मार्फतही निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

- शाळा सुरू करण्याचा निर्णय-

शालेय शिक्षण विभागाच्या दि. २४ सप्टेंबर, २०२१ व दि. २९ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये राज्यातील शाळा सुरु करणेबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यामधील विद्यार्थी तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेवून मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आल्या आहेत . सदर मार्गदर्शक सूचनांमध्ये ज्या शिक्षक -शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लसीकरण पूर्ण झाले आहे , त्यांनाच शाळेत प्रवेश देणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना कोरोनाचा प्रादुर्भाव झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थानिक प्राधिकारी योग्य निर्णय घेण्यास सक्षम आहेत. शाळा सुरु करणेसंदर्भात शासनामार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार राज्यातील ८१.१८ टक्के पालकांनी सर्व सुरक्षा विषयक उपाययोजना करुन प्रत्यक्ष शाळा सुरु झाल्यास त्यांच्या पाल्यास शाळेत पाठविण्याची तयारी दर्शविली होती. तसेच वरील मार्गदर्शक सूचनांमध्ये विद्यार्थ्यांना शाळेतील उपस्थितीबाबत पालकांची सहमती घेणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे . त्यामुळे एकीकडे ओमिक्रॉन रुग्णांची संख्या वाढत असताना सरसकट शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतल्यामुळे पालकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

- शासनाची भूमिका-

आरोग्य व्यवस्थेचे प्रशिक्षण /बळकटीकरण करून तपासण्या व सर्वेक्षण, ट्रेस-ट्रिट-ट्रॅक-लसीकरण-कोवीड अनुरूप वर्तन हया पंचसुत्रीचे पालन करून कोवीड साथरोग आटोक्यात आणण्यासाठी शासन सर्वेतोपरी प्रयत्नशील आहे.

------*******------

महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये लक्षवेधी सुचना

सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (~~बच्चू~~ दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुभाष देशमुख, राजेश पवार, राम कदम, राणाजगजीतसिंह पाटील वि.स.स. यांनी दिलेली महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना खालील प्रमाणे आहे.

"आरोग्य विभागांतर्गत गट 'क' आणि 'ड' वर्गाच्या परीक्षा घेण्याची जबाबदारी दिल्लीतील न्यासा कम्युनिकेशन या कंपनीकडे सोपविण्यात आलेली असणे, सदर परीक्षा सुरुवातीला माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये आयोजित केलेली असणे, तथापि पुरेशी परीक्षा केंद्रे उपलब्ध न होणे, तांत्रिक अडचणी यासारख्या कारणांमुळे ऐनवेळी सदर परीक्षा पुढे ढकलण्यात येणे, त्यानंतर ऑक्टोबर महिन्यात २४ व ३१ रोजी आयोजित करण्यात आलेल्या परीक्षांमध्येही गोंधळ कायम राहणे, प्रश्नपत्रिका मिळण्यात विलंब होणे, चुकीच्या पदाच्या व दुस-याच संवर्गाच्या प्रश्नपत्रिका मिळणे, प्रश्नपत्रिका असलेल्या पेटीचे डिजिटल लॉक न उघडल्यामुळे पेटीचे लॉक कापावे लागणे व त्यामुळे प्रश्नपत्रिका उशिराने मिळणे, एका बाकावर दोन दोन विदयार्थ्यांना बसविण्यात येणे, अशा प्रकारच्या गोंधळाला बहुसंख्य ठिकाणी विदयार्थ्यांना सामोरे जावे लागणे, गोंधळामुळे संतप्त उमेदवारांनी परीक्षा केंद्राबाहेर आंदोलन करणे, मात्र त्यांचे म्हणणे ऐकण्यासाठी केंद्रावर केंद्रसंचालक देखील नसणे, परीक्षा कंपन्यांची निवड करताना काळया यादीत असलेल्या कंपन्यांचीही निवड करण्यात येणे, कंपनी काळ्या यादीत असल्याबद्दल खातरजमा करण्याची कोणतीही यंत्रणा शासनाकडे नसल्याचे स्पष्ट होणे, या परीक्षा दरम्यान पेपर फुटल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने गुन्हे दाखल करण्यात येणे, त्यामध्ये पोलिसांनी अन्य आरोपी बरोबरच शिक्षण संचालनालयातील सहसंचालकांना अटक करणे, यावरुन परीक्षेतील गैरव्यवहाराचे धागेदोरे शिक्षण संचालनालयापर्यंत पोहोचलेले असल्याचे दिसून येणे, कोरोनामुळे ब-याच कालावधीनंतर बेरोजगार युवकांना परीक्षेची संधी मिळालेली असणे, तथापि परीक्षांच्या अशा ढिसाळ नियोजनामुळे व गैरव्यवहारांमुळे बेरोजगारांमध्ये शासनाप्रती चीड निर्माण होणे, या परीक्षा पुन्हा घेण्याची मागणी विद्यार्थ्यांमधून होत असणे, याबाबत शासनाने लवकरात लवकर निर्णय घेण्याची आवश्यकता, शासनाने या संदर्भात करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन

- दि.५ मे २०२१ च्या मंत्रिमंडळ बैठकीत आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवेतील १०० टक्के रिक्त पदे भरण्यास मान्यता दिली.
- आरोग्य सेवा आयुक्तालयाच्या गट क व गट ड संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी संचालक, आरोग्य सेवा पुणे यांनी दिनांक ०५ ऑगस्ट, २०२१ रोजी गट-क संवर्गाचे २७३९ व दिनांक ०७ ऑगस्ट, २०२१ रोजी गट-ड संवर्गाचे ३४६६ पदांची असे एकूण ६२०५ पदांची वर्तमान पत्रात व विभागाच्या संकेतस्थळावर जाहिराती प्रसिद्ध केली.
- भरती प्रक्रिया शासन मान्य पॅनेल संस्थांमधून विहित निकषानुसार मे न्यासा कम्युनिकेशन प्रा.लि. यांची निवड करण्यात आलेल्या संस्थेमार्फत करण्यात आली आहे.

- जाहिरातीनुसार गट-क संवर्गाकरिता ४,०५, १६३ व गट ड संवर्गाकरिता ४,६१,४९७ असे एकूण ८,६६,६६० उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर केले आहेत.

लेखी परिक्षेसाठीच्या जबाबदा-या पुढील प्रमाणे

मे. न्यास कम्युनिकेशन प्रा.लि.	सार्वजनिक आरोग्य विभाग
परिक्षेचे सॉफटवेअर तयार विदयार्थाकडुन ऑनलाईन अर्ज स्विकारणे	मे. न्यास कम्युनिकेशन यांना प्रश्नपत्रिकाउपलब्ध करून देणे.
सर्व उमेदवारांना प्रवेश पत्र निर्गमित करणे, विभागाने पुरविलेल्या प्रश्न पत्रिका व ओएमआर शिट छापून पुरवठा करणे	विभागाकडुन स्ट्रॉगरुम उपलब्ध करून देणे स्ट्रॉगरुम उपलब्ध न झाल्यास विभाग स्तरावर सुरक्षा खोलीची स्थापना करणे.
परिक्षा केंद्राची व्यवस्था करणे व लेखी परिक्षा घेणे	दिव्यांग उमेदवारांना लेखनिक उपलब्ध करुन देणे
ओएनआर शिट स्कॅनिंग करुन उत्तरसूची नुसार प्रत्येक उमेदवाराचे गुण विभागास कळविणे गुणवत्ता यादी तयार करणे.	उमेदवारांना मास्क व सॅनिटायझर उपलब्ध करणे, परिक्षा केंद्रावर जॅमरची व्यवस्था करणे

माहे सप्टेंबर-२०२१ मधील लेखी परिक्षेची पूर्वतयारी.

- गट-क संवर्गाची लेखी परिक्षा राज्यात ८ परिमंडळात दिनांक २५/९/२०२१ रोजी व गट-ड संवर्गाची लेखी परिक्षा ३४ जिल्हयामध्ये दिनांक २६/९/२०२१ रोजी आयोजित करण्यात आलेली होती.
- अर्ज भरत असताना उमेदवारांना संकेतस्थळ योग्य त्या गतीने कार्यान्वित नसणे, परिक्षा शुल्क भरताना अडचणी इ. प्रमुख अडचणी येत होत्या.
- विभागामार्फत दिनांक २५ व २६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या परिक्षेसाठी शैक्षणिक संस्थांचे खोल्या व कोषागार कार्यालयाकडील स्ट्रॉग रुम उपलब्ध करुन देणेबाबत जिल्हाधिकारी व इतर सक्षम प्राधिकारी यांना पत्रान्वये विनंती करण्यात आली होती.
- मे. न्यास कम्युनिकेशन प्रा.लि. यांचेकडून उमेदवारांना प्रवेश पत्र डाऊनलोड व लेखी परिक्षेच्या पुर्वतयारी बाबत विभागास प्रतिदिन प्रगती अहवाल सादर करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत होता. तथापि याबाबतचा कोणताही प्रतिसाद कंपनीकडून मिळाला नाही. परिक्षा केंद्रावर जॅमर बसविण्यासाठी आवश्यक अचूक माहिती अखेरपर्यंत कंपनीकडून प्राप्त झाली नाही.
- या अनुषंगाने दिनांक २३/९/२०२१ च्या पत्रान्वये मे. न्यास कम्युनिकेशन प्रा. लि. यांचेकडून करण्यात आलेल्या परिक्षा केंद्रांच्या आसन गैरव्यवस्थेबाबत नोटीस देण्यात आली होती. तसेच विभागाचे दिनांक २४/९/२०२१ च्या पत्रान्वये मे. न्यास कम्युनिकेशन प्रा. लि. कंपनीस १,०१,३०६ उमेदवारांची बैठक न करणे, मोबाईल जॅमरसाठी अचूक माहिती वेळेत न देणे, स्ट्रॉग रुम उपलब्धतेबाबतची माहिती विभागास सादर न करणे, परिक्षा केंद्रांचे संमतीपत्र विभागास उपलब्ध करुन न देणे, प्रवेश पत्र प्राप्त करुन घेण्यासाठी उमेदवारांना अनेक अडचणी येणे, काही प्रवेश पत्रामध्ये अचूकतेचा अभाव असणे, केंद्र प्रमुखांची यादी विभागास सादर न करणे, लेखनिक उपलब्धतेसाठी दिव्यांग उमेदवारांची यादी न देणे आणि केंद्र समन्वयकांची माहिती विभागास न देणे या गंभीर त्रुटी असल्यामुळे याबाबतचा खुलासा सादर करणेविषयी व पूर्ण क्षमतेने परिक्षा आयोजन करता येईल का, याविषयीची माहिती विभागास सादर करणेविषयी सूचीत केले होते.
- दि. २५ व २६ सप्टेंबर २०२१ च्या परिक्षा आयोजनामधील कंपनीव्दारे राहिलेल्या गंभीर त्रुटी. बैठक व्यवस्था दिनांक २४/९/२०२१ रोजी संध्याकाळ पर्यंत पूर्ण होऊ शकली नाही, परिक्षा केंद्राचे आरक्षण उमेदवारांच्या अर्जांच्या प्रमाणात केले नाही, बैठक व्यवस्था पूर्ण होऊ शकले नसल्यामुळे प्रवेश पत्र उमेदवारांना वेळेत निर्गमित करण्यात आले नाही, तांत्रिक अडचणींमुळे काही उमेदवारांना शेवटपर्यंत

प्रवेश पत्र दिले नाहीत, प्रवेश पत्र निर्गमित करण्यामध्ये अनेक प्रकारच्या चुका झाल्याचे निदर्शनास आले. या सर्व गैरव्यवस्थापनामुळे न्यासा कंपनीने दि. २५ व २६ सप्टेंबर रोजी परिक्षा घेण्यास दि. २४ सप्टेंबर सायंकाळी ७.३० वाजता दुरध्वनीवर असमर्थता कळविली.

- मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचेस्तरावरुन दि. २५ व २६ सप्टेंबर, २०२१ रोजी होणारी लेखी परिक्षा पुढे ढकलण्यात आले असल्याचे सार्वजनिकरित्या प्रसिध्द करण्यात आले आहे.
- विभागाने दिनांक २५/९/२०२१ रोजी परिक्षेच्या आयोजनामध्ये आढळून आलेल्या गंभीर त्रुटींबाबत कंपनीस कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे.
- गट-क संवर्गाची लेखी परिक्षा दिनांक २४/१०/२००२१ व गट-ड संवर्गाची लेखी परिक्षादिनांक ३१/१०/२०२१ रोजी घेण्यास कंपनीने तयारी दर्शविली त्यानुसार पुन्हा परीक्षांचे नियोजन करण्यात आले.
- माहे सप्टेंबर २०२१ मधील पुर्वानुभव विचारात घेऊन, विभागाकडून दिनांक ०६/१०/२०२१ पासून दररोज परिक्षेच्या पुर्वतयारीबाबत मा. आयुक्त आणि विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांनी व्हिसी बैठकीव्दारे परिक्षेचे पुर्वतयारी संदर्भात मे. न्यास कम्युनिकेशन प्रा.लि. आणि मंडळस्तरावरील व जिल्हास्तरावरील वरिष्ठ अधिकारी यांचेसोबत आढावा घेतला.
- मा. आयुक्त, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांचेकडून दिनांक १८/१०/२०२१ व दिनांक २०/१०/२०२१ च्या पत्रान्वये परिक्षेकरिता पोलिस संरक्षण, परिक्षा केंद्र खोल्या व्यवस्था होणेबाबत संबंधित पोलिस यंत्रणा व जिल्हाधिकारी यांना विनंती करण्यात आली.
- विभागाकडून दि.०६ ऑक्टोबर, २०२१ पासून नियमित आवश्यक तेथे सहाय करण्यात आलेले असतानासुध्दा व व्ही. बैठका परिक्षेचे पूर्वतयारीची आढावा घेऊन सुध्दा दिनांक २४/१०/२०२१ रोजीच्या गट-क पदाच्या लेखी परिक्षेमध्ये कंपनीच्या गैरव्यवस्थापन, समन्वयाचा अभाव व अपुरे प्रशिक्षण हया त्रुटी आढळून आलेल्या आहेत.

  परिक्षा आयोजनामध्ये कंपनीच्या निष्काळजीपणामुळे तसेच गैरव्यवस्थापनामुळे प्रश्नपत्रिका असलेल्या पेटया दिलेल्या क्रमांकानुसार उघडल्या नाहीत, त्यामुळे पेटयांची कुलूपे तोडावी लागली ही वस्तुस्थिती आहे. ज्या संवर्गाचे उमेदवारांना प्रवेश पत्र दिले त्या संवर्गाच्या प्रश्नपत्रिका संबंधित परिक्षा केंद्रावर उपलब्ध नव्हत्या, १२ संवर्गाच्या उमेदवारांना चुकीच्या प्रश्नपत्रिका देण्यात आल्या, काही परिक्षा केंद्रावर समन्वयक हजर नव्हते, परिक्षा केंद्रावर पुरेशे पर्यवेक्षक हजर नव्हते, उमेदवारांची तपासणी योग्य प्रकारे केली नाही. जिल्हा व्यवस्थापक / केंद्र समन्वयक इत्यादींचे प्रशिक्षण योग्य प्रकारे झाले नाही.

  सदरील गंभीर त्रुटींच्या अनुषंगाने विभागाचे दिनांक २५/१०/२०२१ अन्वये मे.न्यास कम्युनिकेशन प्रा.लि. यांना पुनश्च नोटीस बजावण्यात आली होती.
- अमरावती येथील तक्षशिला परिक्षा केंद्रामध्ये दिनांक २४/१०/२०२१ रोजीच्या गट-क संवर्गाच्या परिक्षेमध्ये दिनांक ३१/१०/२०२१ रोजीचे गट-ड संवर्गाची प्रश्नपत्रिका सोडविण्याकरिता उमेदवारांना देण्यात आल्याची बाब निदर्शनास आली होती. सदर बाब लक्षात आल्यानंतर संचालक यांनी दिनांक ०३/११/२०२१ च्या पत्रान्वये या प्रकरणाची तपासणी करून चौकशी अहवाल सादर करण्याबाबत पोलीस आयुक्त अमरावती यांना चौकशी अहवाल सादर करण्याबाबत सुचना दिल्या होत्या. तसेच न्यासा कंपनी प्रा.लि. या कंपनीलाही याबाबत सक्त सुचना देण्यात आल्या. दि. २४.१०.२०२१ रोजी झालेल्या गट क संवर्गाच्या परीक्षेच्यावेळी दि. ३१.१०.२०२१ रोजी होणाऱ्या गट ड च्या परीक्षेची

प्रश्नपत्रिका देण्यात आल्याचे निष्पन्न झाल्याने या १० परीक्षार्थींची दिनांक २८.११.२०२१ रोजी गट क संवर्गासाठी परीक्षा घेण्यात आली.

- तदनंतर अमरावती येथील तक्षशिला परिक्षा केंद्रामधील इतर काही उमेदवारांना असे गट-ड पदाची प्रश्नपत्रिका देण्यात आली किंवा कसे याबाबत कंपनीस विचारणा केले असता, कंपनीस सदर परिक्षा केंद्रामध्ये दिनांक २४/१०/२०२१ रोजीच्या गट-क संवर्गाच्या परिक्षेच्या वेळी श्रीमती शारदा निरंजन येवले यांचेसह १० उमेदवारांना गट ड संवर्गाची प्रश्नपत्रिका देण्यात आल्याचे निष्पन्न झाले. सदर १० उमेदवारांची दिनांक २८/११/२०२१ रोजी गट-क संवर्गाची लेखी परिक्षा पुनश्च घेण्यात आलेली आहे.
- उमेदवारांनी ज्या पदाकरिता अर्ज केले आहेत त्या पदाऐवजी अन्य पदाचे प्रश्नपत्रिका सोडविण्याकरिता देण्यात आल्याची बाब निदर्शनास आले असता, मे.न्यास कम्युनिकेशन प्रा. लि. यांना अशा उमेदवारांचे मुळ अर्ज प्रवेश पत्र, स्कॅनड ओएमआर शीट याची पडताळणी करुन सादर करणेबाबत कळविण्यात आली होती. या माहितीमध्ये १२ संवर्गातील ५९० उमेदवारांना चुकीची प्रश्नपत्रिका दिल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे मे. न्यासा कम्युनिकेशन प्रा. लि. यांनी अशा प्रकारचे १२ संवर्गातील एकूण ५९० उमेदवारांचे दिनांक २८/११/२०२१ रोजी पुर्नपरिक्षा घेण्यात आलेली आहे.
- विभागाकडून उर्वरित ४० संवर्गाची गुणपत्रिका विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. १२ संवर्गाचे पुर्नपरिक्षा घेतले असल्यामुळे सदर पदांचे निकाल प्रलंबित आहे.
- दिनांक ३१/१०/२०२१ रोजी गट ड संवर्गाची ३४ जिल्हयामध्ये १३६५ परिक्षा केंद्रात घेण्यात आली होती.
- विभागाकडे दिनांक ३१/१०/२०२१ रोजीच्या गट-ड संवर्गाची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या तक्रारी, प्राप्त झालेल्या होत्या.
- संचालक, आरोग्य सेवा पुणे यांना त्याच दिवशी दुपारी ०४.३७ वाजता व त्यानंतर रात्री ०९.११ पर्यंत असे एकूण १३ व्हॉटस अप मेसेजच प्राप्त झालेले होते. सदर व्हॉटसअप मेसेजच्या अनुषंगाने पोलिस आयुक्त, मुंबई यांना तपास करणेबाबत आयुक्तालयाचे दिनांक ०२/११/२०२५ रोजीच्या पत्राने विनंती केलेली आहे.
- त्यानंतर औरंगाबाद सायबर सेल यांचेकडून देखील गट-ड संवर्गाची प्रश्नपत्रिका फुटल्याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने देखील विभागाकडून पोलिस आयुक्त, मुंबई यांना तपास करणेबाबत विनंती करण्यात आलेली आहे.
- गट-ड संवर्गाची प्रश्नपत्रिका फुटल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने विभागाकडून दिनांक २६/११/२०२१ रोजी सायबर पोलिस स्टेशन, पुणे शहर, पुणे यांचेकडे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
- सदर दाखल गुन्हयात (१) श्री. महेश सत्यवान बोटले, प्रभारी सहसंचालक, आरोग्य सेवा (अतांत्रिक) मुंबई (२) श्री. प्रशांत व्यंकटराव बडगिरे, मुख्य प्रशासकीय अधिकारी, लातूर मंडळ, लातूर (३) डॉ. संदीप त्रिंबकराव जोगदंड, वैदयकीय अधिकारी, मनोरुग्णालय अंबेजोगाई, बीड (४) श्री. राजेंद्र पांडूरंग सानप, सहा अधिक्षक, ग्रामीण रुगालय भुम, उस्मानाबाद व (५) श्री. शाम महादू मस्के, चतुर्थश्रेणी कर्मचारी, स्त्री रुग्णालय नेकनूर, बीड यांना अटक करण्यात आले असून, सदर पाचही आरोपी दिनांक १८/१२/२०२१ रोजी पर्यंत पोलिस कोठडी रिमांडमध्ये आहेत. सायबर पोलिस स्टेशन, पुणे शहर, पुणे यांचेकडून पुढील तपास सुरु आहे.
- विभागाने संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर निलंबनाची कारवाई केली आहे.
- सदर प्रकरणी पोलीस तपास सुरु असल्याने पोलीस अहवालानुसार गट क व ड संवर्गाच्या परीक्षेबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.

- - - - - -

लक्षवेधी सूचना क्रमांक ७२६

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२१ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.७२६ पुढीलप्रमाणे आहे :-

"शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी विद्यार्थ्यांना वाहतूक सुविधा पुरविण्याकरिता वसतिस्थाने घोषित करणेबाबत राज्य शासनाने शासन निर्णय निर्गमित केलेला असणे, राज्यातल्या १० पेक्षा कमी पट संख्या असलेल्या वस्ती स्थानातील शाळा बंद करुन तेथील नजिकच्या शाळांमध्ये जाण्यासाठी वाहतुकीची व्यवस्था करण्यात येणार असणे, सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील शिक्षणहक्क कायद्याचे उल्लंघन होऊन अनेक विद्यार्थ्यांना सातत्याने आठ किलोमीटरचा प्रवास करावा लागून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊन त्यांच्या पालकांमध्ये निर्माण झालेले चिंतेचे व असुरक्षितचे वातावरण, सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून शाळा व निवासस्थाने यातील अंतराबाबतच्या प्राप्त झालेल्या माहितीच्या विश्लेषणानुसार व वाहतूक सुविधेचा लाभ अनेक विद्यार्थ्यांना प्रदान करण्यासाठी आतापर्यंत तब्बल एकूण ३०३७ वस्तीस्थाने व त्यांतील १६ हजार ३३४ विद्यार्थ्यांची संख्या निश्चित करण्यात आलेली असणे, राज्यातील शिक्षण हक्क कायद्याखाली (आरटीई) तरतुदीनुसार वंचित घटकातील चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांला वस्तीनजिकच्या एक किलोमीटरच्या परीसरात शाळा उपलब्ध करुन देणे बंधनकारक असणे, तर सातवी पर्यंतच्या विद्यार्थ्याला तीन किलोमीटर परिसरात शाळा उपलब्ध होण्याबाबत पट संख्येचे कारण दाखवून दिनांक ०९ डिसेंबर, २०२१ रोजी शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने शुध्दीपत्रक काढण्यात येऊन राज्यातील रायगड, ठाणे, पालघर आणि नाशिक तसेच इतर आदिवासी व दुर्गम जिल्हयातील कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णयाच्या विरोधात आदिवासी समाजातील लाखो गरीब व वंचित घटकातील विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होऊन त्यांच्या आयुष्यातील महत्वाचे वर्ष व भवितव्य धोक्यात येणे, परिणामी ऐन हिवाळी अधिवेशनाच्या तोंडावर श्रमजीवी संघटनेने दि.१५ डिसेंबर, २०२१ रोजी मुंबईतील आझाद मैदानात "दप्तर घ्या, बकऱ्या द्या" तीव्र आंदोलन करुन सदरची धक्कादायक बाब शासनाच्या निदर्शनास आणूनही त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे निवेदन

केंद्र शासनाचा बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क कायदा, २००९ च्या अनुषंगाने महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ पारीत करण्यात आला असून या नियमामधील कलम ४ मधील उपकलम ३ नुसार ज्या ठिकाणी सदर नियमातील परिशिष्ट १, कलम ४ मधील उप कलम १ मधील खंड (ए) नुसार इ. १ ली ते इ.५ वी या इयत्तांमध्ये

शिकणाऱ्या बालकांच्या वस्तीनजीकच्या १ किलोमीटर अंतराच्या आत व उपकलम १ मधील खंड (बी) नुसार इ.६ वी ते ८ वी मध्ये शिकणाऱ्या बालकांबाबत वस्तीनजीकच्या ३ किलोमीटर अंतराच्या आत शाळा उपलब्ध नाही, अशा राज्य शासनाने किंवा स्थानिक प्राधिकरणाने ठरवून दिलेल्या लहान वस्तीमधील बालकांकरिता शाळेमध्ये प्राथमिक शिक्षण देण्याच्या प्रयोजनार्थ वाहतूक भत्ता/ वाहतूक सुविधा उपलब्ध करुन दयावयाची तरतूद आहे. सदर तरतुदीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून वरील प्रकारच्या वस्तीस्थानांची माहिती मागवून व त्यांची खातरजमा करुन एकूण ३०७३ वस्तीस्थाने व त्यामधील १६३३४ विद्यार्थी यांना सन २०२०-२१ या वर्षासाठी वाहतूक सुविधा देण्यासाठी पात्र ठरवून याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्याची विनंती शासनास केली होती. त्यानुसार दि.२४ मार्च, २०२१ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. तथापि सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टामध्ये काही वस्तीस्थानांचे शाळेपासुनचे अंतर संगणकीय दोषामुळे त्रुटीपूर्ण दर्शविण्यात आले होते. सदर त्रुटी दूर करुन वस्तीस्थानांचे शाळेपासूनचे योग्य अंतर दर्शविण्यासाठी दि. ०९ डिसेंबर, २०२१ रोजी शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुसार मूळ दि. २४ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्ट अ मधील एकूण ४५ वस्तीस्थाने व परिशिष्ट ब मधील एकूण२ वस्तीस्थानांचे अंतर दुरुस्त करण्यात आले आहे.

दि.१५ डिसेंबर, २०२१ रोजीच्या काही माध्यमांमध्ये राज्य शासन कमी पटसंख्या असलेल्या ३०३७ शाळा बंद करण्यात येणार असल्याची बातमी प्रसिध्द झाली होती. यासंदर्भात शासनामार्फत विविध माध्यमांद्वारे खुलासा प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यानुसार वरीलप्रमाणे विद्यार्थ्यांना वाहतूक सुविधा उपलब्ध करुन देण्याची योजना केंद्र शासन पुरस्कृत समग्र शिक्षा योजनेअंतर्गत काही वर्षापासून राबविण्यात येत आहे. मात्र अशा प्रकारे वाहतूक सुविधा उपलब्ध करुन दिल्यामुळे अद्यापपर्यंत कोणतीही शाळा बंद करण्यात आलेली नाही. सदर योजनेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेपर्यंत पोचण्यास सहाय्य मिळत आहे. कोणतीही कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा सदर शासन निर्णयांचा उद्देश नाही. केंद्र शासनाच्या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

****

H/545-19

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग

लक्षवेधी सूचना

सन २०२१ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

श्री. ज्ञानराज चौगुले, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मीरा भाईंदर महापालिकेच्या महापौरांच्या फॉर्म हाऊसच्या सिमेंटकाँक्रीटच्या रस्त्यासाठी राज्य शासनाच्या दलित वस्ती सुधारणा योजनेचा २१ लाख रुपये निधी बेकायदेशिररित्या वापरण्यात येऊन यामध्ये आर्थिक गैरव्यवहार, गैरप्रकार आणि अनियमितता करण्यात अल्याची गंभीर बाब नुकतीच निदर्शनास येणे, मीरा भाईंदर येथील काशिमीरा भागातील प्रभाग १४ मधील मौजे काशी सर्व्हे क्र ५१/२ ही पागेरा आदिवासी कुटुंबाची १४ गुंठे जमीन कवडीमोल भावाने नोटरी करुन बेकायदेशीररित्या खरेदी करण्यात येणे, त्यानंतर सदरहू जागेत २०१९ मध्ये महापालिकेची कोणतीही परवानगी न घेता दोन खोल्यांचे बांधकाम करण्यात येणे, आणि या ठिकाणी बोअरवेल सुरू करून पाणी पुरवठा प्रकल्प बेकायदेशीररित्या सुरू करण्यात येणे, सदरहू प्रकरणी पालिकेचा निधी फार्महाऊसच्या रस्त्यासाठी वापरल्याची तक्रार उपशहर प्रमुखांनी मा. आयुक्तांकडे लेखी स्वरुपात करण्यात येऊनही अद्याप यावर सदरहू जागेतील अनधिकृत बांधकाम आणि शासकीय दलित वस्ती योजनेच्या निधीचा गैरवापर करुन निधीचा अपहार केल्या प्रकरणाची चौकशी करुन दोषींविरुध्द शासनाने कारवाई करण्यात न येणे, सदर प्रकरणात ज्या अधिकाऱ्याने बांधकामास कोणतीही परवानगी नसतानाही कर आकारणी करणे, वीज पुरवठा करणे, वृध्दाश्रमाच्या नावाखाली दलित वस्ती निधी महापौर यांच्या शिंदेवाडी फार्म हाऊस परिसरात सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यासाठी खर्च करणे, सदर प्रकरणी संबधीत दोषी अधिकाऱ्यांस तात्काळ निलंबीत करुन महापौरांचे पती यांचेवर एमआरटीपी सह अन्य कलमांखाली गुन्हा दाखल करुन, बेकायदा बांधकाम प्रकरणी महापौराचे नगरसेवक पद रद्द करण्याची होत असलेली मागणी, सदरहू प्रकरणी उच्च स्तरावरुन चौकशी करुन शासकीय निधीचा गैरवापर आणि अनधिकृत बांधकाम प्रकरणी त्वरीत दखल घेऊन तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रा. म. क्र. ०८ माश्याचा पाडा शाळेजवळील रस्ता तयार करणे कामाचे दि.२६.०७.२०२१ रोजी कार्यादेश देण्यात आले आहे. सदर काम हे अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत करण्यात आले आहे. प्रभाग क्र.१४ रा.म.क्र.०८ माशाचा पाडा शाळेजवळील रस्ता हा माशाचापाडा पागेरपाडा, वरठपाडा जाण्याकरीता आहे. प्रभाग क्र. १४ मधील एक नगरसेवक अनुसूचित जाती प्रवर्गातील आहे. शासन निर्णय दि. ०५ मार्च २००२ च्या मार्गदर्शक तत्वानुसार अण्णाभऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेमधील कामे नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी राखीव प्रभागात करणे अनुज्ञेय आहे. सदर काम स्थानिक नागरिकांनी मागणी केल्यामुळे प्रस्तावित करण्यात आले आहे. सदर कामास महासभा, स्थायी समिती सभा व जिल्हाधिकारी ठाणे यांची मान्यता प्राप्त आहे. सदर ठिकाणी लोकवस्तीकडे व शाळेकडे जाणारी वहिवाट असून सदर वहिवाट कॉक्रीटीकरण करुन पक्का रस्ता करण्यात आला आहे. सदर रस्त्याचा वापर हा माशाचापाडा, वरठपाडा, पागेरपाडा इत्यादी आदिवासी पाड्याकडे जाण्यासाठी करण्यात येत असून रस्त्याच्या कडेला वृध्दाश्रम व लोकवस्ती आहे. सदर ठिकाणी आदिवासी कुटूंब पिढ्यान-पिढ्या राहत असून, सदर पाड्यातील कुटुंबाचे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सर्वेक्षण करण्यात आले आहे. सदर आदिवासी कुटूंबांना व शाळकरी मुलांना येण्याजाण्यासाठी सदर रस्त्याचा उपयोग होत आहे. सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारे निधीचा दुरूपयोग झालेला नाही.

रोय H152/ (800-12-21)

****

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग **लक्षवेधी सूचना**

सन २०२१ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

श्री. ज्ञानराज चौगुले, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मीरा भाईंदर महापालिकेचे संबंधीत अधिकारी, कर्मचारी यांनी मे. हिया डेव्हलपर्स ॲण्ड कन्स्ट्रक्शन चे संचालक विनोद लालचंद मेहता व मे. सेव्हन कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या विकासक कंपन्यांना आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी, आर्थिक संगनमत करून गोडदेवकडे जाणारा विकास आराखड्यातील रस्ता बेकायदेशीररित्या स्थलांतरीत करून एका महिलेच्या मालकी हक्काच्या वहिवाटीच्या जमिनीतून त्यांच्या परवानगी शिवाय बेकायदेशीररित्या दाखविल्याचा नुकताच उघडकीस आलेला धक्कादायक प्रकार, विनोद मेहता यांचे बंधू हे लोकप्रतिनिधी असताना त्यांच्या राजकीय अधिकाराचा वापर करून सदरहू गैरप्रकार करण्यात आल्याची बाब निदर्शनास येणे, यामुळे अन्याय झालेल्या सौ. नंदीनी आधवडे पाटील यांनी मा. महानगरपालिका आयुक्त आणि नगररचनाकार यांचे लेखी स्वरूपात तक्रार दाखल करण्यात येऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही न करता, सदरहू प्रकरण अर्थपूर्ण व्यवहार करून दडपण्यात आल्यामुळे सदरहू तक्रारदार महिलेला अद्यापही न्यायापासून वंचित राहावे लागणे, प्रकरणी तक्रारदार महिलेने मा.मुख्यमंत्री तथा शासनाकडे अनेकवेळा तक्रार करण्यात येऊनही त्याची दखल घेण्यात न येणे, या कारस्थानात संशयित असलेले महापालिकेचे मुख्य सर्व्हेअर श्री.म्हात्रे, कनिष्ठ अभियंता कृष्ण माहिते, राजेंद्र पांगळ, नगररचनाकार हे.रा.ठाकूर आदींना तात्काळ निलंबीत करून त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागा मार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने उच्च स्तरावरून हस्तक्षेप व चौकशी करून तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे गोडदेव, स.क्र.७९ (जुना) ३ (नविन) हि.क्र.१ या जागेतील प्रस्तावित इमारत प्रकार -१ (पार्ट तळ + १३) ३७६७.०६ चौ.मी. करीता अधिकारपत्रधारक मे. हिया डेव्हलपर्स ॲण्ड कंनस्ट्रक्शनचे प्रोप्रा. श्री.विनोद लालचंद मेहता, सल्लागार अभियंता मे. अनिष ॲण्ड असो., यांना पत्र क्र.मिभा/मनपा/नर/७५००/२०१८-१९ दि.३०/०३/२०१९ अन्वये नकाशे मंजुरीसह बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

उपरोक्त जागेत बांधकाम परवानगीच्या वेळेस मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील स.क्र.७९/१ या जागेतून अधिकारात Realignment करण्यास मान्यता देण्यात आलेली असून सदर Realignment मुळे मौजे गोडदेव, स.क्र.८८/२ या लगतच्या जागेचा काही भाग बाधीत होत आहे. सदर Realignment संदर्भात जागा मालकाची संमती / नाहरकत दाखला सादर करणे आवश्यक असल्याने याबाबत विकासक यांनी दि.१८.०२.२०१९ अन्वये हमीपत्र सादर केले आहे. तसेच बांधकाम परवानगीतील अट क्र.३६ अन्वये जोत्याच्या दाखल्यापूर्वी विकास योजना रस्त्याने बाधित स.क्र.८८/२ या जागेचे जागा मालकांची संमती / नाहरकत दाखला सादर करणे बंधनकारत असल्याचे नमुद केलेले आहे. विषयाधीन भुखंडात सद्या पायलिंगचे काम सुरू आहे. जोता अद्याप झालेला नाही.

विषयांकित जागेतील प्रस्तावित इमारतीस बांधकाम परवानगीच्या अहवालात १८.०० मी. रूंद विकास योजना रस्त्याची स.क्र.८८/२ मध्ये Realignment केल्यामुळे सदर जागेबाबत सौ.नंदिनी आधवडे पाटील यांनी तक्रार केलेली आहे. त्याचप्रमाणे मौजे गोडदेव, स.क्र.७९ (जुना) ३ (नविन) हि.क्र.१ या जागेतील बांधकाम परवानगी रद्द करण्याची मागणी केलेली आहे. उपरोक्त प्रकरणी तक्रारीच्या अनुषंगाने दि.२१.१२.२०२१ रोजी सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीत उपस्थित तक्रारदार व विकासक यांनी त्यांच्याकडील कागदपत्रे व त्यांचे लेखी म्हणणे सादर केलेले असून त्याअनुषंगाने पडताळणी करून नियमानुसार पुढील नियमोचित कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

रोटा H/522-1(800-12-21) **********

नगर विकास विभाग **महाराष्ट्र विधानसभा** **लक्षवेधी सूचना**

सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

श्री.ज्ञानराज चौगुले, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" नाशिक येथील वोक्हार्ट रुग्णालयाची घरपट्ट्याची सुमारे दिड कोटी रुपयांची थकबाकी असतानाही नाशिक महानगरपालिकेच्या वैद्यकीय आणि अग्निशमन विभागाने बेकायदा व नियमबाह्य रित्या सदरहू रुग्णालयाला ना-हरकत प्रमाणपत्र दिल्याचा गैरप्रकार नुकताच निदर्शनास येणे, गेली पावणे दोन वर्षापासून करोना महामारीमुळे नाशिक महापालिकेच्या महसूलात मोठ्या प्रमाणात घट झाली असतांना मनपा प्रशासनाने महसूल वाढविण्याच्या दृष्टीने अनेक पावले उचलली जात असतांना यामध्ये अनेक बड्या थकबाकीदारांना नोटीसा पाठवून त्यांच्या मालमत्ता जप्त करण्याची कारवाई महापालिकेच्या कर आकारणी विभागामार्फत सुरु असणे, आज मितीस थकबाकीदारांकडे घरपट्टी पोटी सुमारे ३५० कोटीहून अधिक थकबाकी असणे तर पाणीपट्टी ८० कोटीहून अधिक असणे, महापालिकेची थकबाकी दिवसेंदिवस वाढत असतांना पालिकेच्या वैद्यकीय आणि अग्निशमन विभागाने वोक्हार्ट रुग्णालयाची दिड कोटी रुपयांची थकबाकी असतांनाही तसेच महापालिका आयुक्त यांचे रुग्णालयाची नोंदणी किंवा फायर ऑडीटबाबत एनओसी देतांना संबंधितांकडे कोणत्याही प्रकारची थकबाकी असल्यास ती दिली जाऊ नये असे स्पष्ट आदेश असणे, याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन संबंधित रुग्णालयास ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येणे, सर्वसामान्य नागरीकांना थकबाकीपोटी नोटीस पाठवून मालमत्ता जप्त करण्याची त्वरीत कारवाई करण्यात येत असणे, परंतू, वोक्हार्ट रुग्णालयासह बड्या थकबाकीदारांकडून थकीत रक्कम वसूल करण्यासाठी शासन तथा नाशिक महापालिका प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही न करता बड्या थकबाकीदारांना पाठीशी घालून संरक्षण दिल्याचा प्रकार निदर्शनास येणे, यामध्ये वैद्यकीय विभागाचे प्रमुख व अग्निशमन विभागाचे प्रमुख यांनी मोठा आर्थिक गैरप्रकार करुन नाशिक महानगरपालिकेचे केलेले प्रचंड आर्थिक नुकसान, परिणामी येथील जनतेत शासन तथा महापालिकेविषयी निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व अविश्वासाचे वातावरण, याकडे झालेले शासनाने अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिका हद्दीतील वोक्हार्ट हॉस्पिटल, नाशिक यांची रुग्णालय नोंदणी दि.३१/०३/२०१९ पर्यंत देण्यात आलेली होती. सदर रुग्णालयाने नोंदणी नूतनीकरण करिता दि.२९ मार्च २०१९ रोजी विहित नमुन्यामध्ये महानगरपालिकेकडे अर्ज सादर केलेला होता. सदर रुग्णालयाची जागा ही खाजगी मालकीची असून भाडेतत्वावर घेण्यात आलेली आहे. सदर जागेचे मालक यांच्याकडे त्यांच्या अन्य मालमत्तेची थकबाकी आहे. त्याबाबत संबंधित जागा मालक यांनी मा.जिल्हा न्यायालयात महानगरपालिकेविरुध्द दावा दाखल केलेला असून, सदर दावा प्रलंबित आहे.

रोटा / पृष्ठ- ५१३ (८००-१२-२०२१)

वोक्हार्ट हॉस्पिटलने रुग्णालय तातडीने सुरु करण्यासाठी अपिल दाखल करतेवेळेस मालमत्ता कराचा संपुर्ण भरणा केला असून, वेळोवेळी रु.१.२८ कोटी रुपये मालमत्ता कराच्या अनुषंगाने तक्रार ठेवून भरलेले आहेत. त्याचसोबत संबंधितांनी मा.न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन राहून, घरपट्टी रक्कम भरण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र महानगरपालिकेस सादर केलेले आहे.

नाशिक शहरामध्ये कोरोनाची दुसरी लाट ही फेब्रुवारी २०२१ ते जुन २०२१ या कालावधीमध्ये आलेली होती. सदर कालावधीमध्ये रुणांना बेड उपलब्ध करून देणे याकरिता नाशिक महानगरपालिकेस खूप परिश्रम घ्यावे लागले. तसेच, काही विमा कंपन्यांनी खाजगी रुग्णालयाचे नर्सिंग होम ॲक्टनुसार नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक केले होते. यावरून बरेच नागरिकांना मेडिक्लेमचा लाभ घेता आला नाही. रुग्णालयांमध्ये भरती होणाऱ्या रुग्णांना मेडीक्लेम लाभ मिळत नाही, याकरिता नागरीक वारंवार नाशिक महानगरपालिकेत तसेच सम्माननीय लोकप्रतीनिधींकडे तक्रारी करत होते.

या पार्श्वभूमीवर रुग्णालयांना तात्पुरत्या स्वरुपामध्ये रुग्णालय नोंदणी, नूतनीकरण प्रमाणपत्र देणे आवश्यक होते. जेणेकरून नागरिकांना आर्थिक नुकसान होणार नाही. तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन परिपत्रक दि.२५/०५/२०२०, दि.०८/०५/२०२१ व दि.२१/१०/२०२१ अन्वये, सर्व खाजगी रुग्णालयांचे फेब्रुवारी २०२२ पर्यंत वेळोवेळी तत्वतः नोंदणी नूतनीकरण करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसुरक्षा उपाययोजना अधिनियम २००६ च्या कलम ३ (३) नुसार, मालक/भोगवटादार यांनी अग्निशमन विभागाकडे शासनमान्य संस्थेमार्फत फायर ऑडीट रिपोर्ट (फॉर्म बी) दाखल करून सदर दाखल्याचे नियमानुसार नूतनीकरण करण्यात आलेले आहे.

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ४१ अन्वये, नाशिक महानगरपालिकेत आपत्ती व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. शासनाने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ हा दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड-२, ३ व ४ मधील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. ती आजतागायत लागू आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.१४/०३/२०२० च्या अधिसूचनेतील, कोवीड-१९ उपाययोजना नियम २०२० मधील नियम क्र. १० अन्वये, आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना नाशिक महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्राकरिता सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे. नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना बाधित रुग्ण संख्या झपाट्याने वाढत असल्याने कोरोना प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासाठी नागरिकांना अथवा रुग्णांना उपचारासाठी बेड मिळवून देणे ही प्राथमिकता असल्याने, शहरातील खाजगी रुग्णालयातील बेड आरक्षित करण्यात आले होते.

मा.न्यायालयात दाखल झालेले म्युन्सीपल अपील हे मिळकतीचे मालक व नाशिक महानगरपालिका यांचेमध्ये आहे. वोक्हार्ट हॉस्पिटल हे मिळकतीचा भाडे तत्त्वावर वापर करीत असुन, त्यांच्यामध्ये झालेल्या भाडेकरारनाम्यानुसार मालमत्ता कर भरण्याची जबाबदारी मिळकतीचे मालक यांची असून हॉस्पीटलची नसल्याने व कोविडच्या दुसऱ्या लाटेच्या अति संकटाच्या काळामध्ये कोरोना प्रतिबंधात्मक कार्यवाही प्रखरतेने करण्यासाठी नागरिकांचे हित लक्षात ठेवून सदर हॉस्पिटलला महाराष्ट्र नर्सिंग होम ॲक्ट अंतर्गत नूतनीकरण प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

****

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग **लक्षवेधी सूचना**

सन २०२१ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

श्री. ज्ञानराज चौगुले, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहेः-

"मीरा-भाईंदर (जि. पालघर) महापालिकेत मर्जीतील ठेकेदाराला निविदा मिळण्यासाठी अनेकदा अटी-शर्ती टाकतानाच तीनवेळा मुदतवाढ देऊन तब्बल १९ ते २२ टक्के इतक्या चढ्या दराच्या ९ सिमेंट रस्त्याच्या कामाच्या निविदेस स्थायी समिती तर्फे मंजुरी देण्यात येऊन यामध्ये मोठ्या प्रमाणात निविदा फिक्सिंग करून, निविदा घोटाळा करण्यात आल्याचा प्रकार नुकताच उघडकीस येणे, सदरहू महापालिकेत निविदा सूचना क्रमांक ४२ व ४३ मधील बाकी सर्व निविदा २० ते २५ टक्के कमी दराने स्थायी समिती तर्फे मंजूर करण्यात येणे, मात्र मर्जीतील ठरावीक कंत्राटदारांना सिमेंट रस्त्याचे काम देण्यासाठी चढ्या दराने निविदा मंजूर करण्यात येणे, वारंवार शुध्दीपत्रके काढून मुदतवाढ देऊन अटी-शर्ती पूर्ण करणाऱ्या प्रामाणिकपणे निविदा भरून काम करणाऱ्या कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेतून बाहेर काढून त्यांच्यावर अन्याय करण्यात येत असणे, शिवाय चढ्या दराने सिमेंट रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून उच्च दर्जाच्या रस्त्याचे काम करण्यात न येता यामध्येही मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळा करण्यात येऊन महापालिकेचे कोट्यावधी रुपयांचे आर्थिक नुकसान होत असल्याचा गंभीर प्रकार उघडकीस येणे, सदरहू निविदा प्रक्रियेत मोठा गैरव्यवहार आणि भ्रष्टाचार होत असून, याबाबत लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीनुसार चौकशी समिती नेमून, या सर्व प्रकारास जबाबदार असलेल्या महापालिकेतील अभियंत्यास तात्काळ निलंबित करून त्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागा मार्फत चौकशी करण्याची केलेली मागणी, परंतु सदरहू चौकशी समितीने अद्यापही याबाबत कोणतीच कार्यवाही न करणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने उच्च स्तरावरून हस्तक्षेप व चौकशी करून तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

मिरा-भाईंदर क्षेत्रातील करावयाच्या विकास कामाअंतर्गत सिमेंट रस्ते तयार करणेबाबत महासभेने दिलेल्या प्रशासकीय व आर्थिक मान्यतेनुसार सदर कामाकरीता निविदा सूचना क्र. ४३, दि.२७.०७.२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आली.

सदर निविदेमध्ये सिमेंट रस्त्याचे कामाकरीता प्राप्त झालेल्या सर्व निविदाधारकांना कागदपत्रांची निविदेमध्ये नमूद केलेल्या अटी-शर्तीनुसार तांत्रिक छाननी करण्यात येऊन पात्र ठरलेल्या निविदाधारकांची प्राईजबिड उघडण्यात आली.

सदर कामाकरीता प्राप्त झालेले दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त होते. निविदा मागविलेल्या कामाच्या अंदाजपत्रकातील दर हे सन २०२०-२१ या वर्षाच्या राज्य दर सूचीतील होते. प्रत्यक्षात सदर निविदा मागविताना सद्यस्थितीत सन २०२१-२२ या वर्षाची राज्य दर सूची उपलब्ध असल्याने सदर दरानुसार नव्याने अंदाजपत्रके तयार करण्यात आली. सदर प्रकरणी सर्वात कमी दराच्या निविदाधारकासोबत निविदा समिने वाटाघाटी करून दर कमी केले आहेत.

नवीन राज्य दर सूचीतील दरानुसार प्राप्त निविदेतील दराशी (दरवाटाघाटीनंतर) तुलना करण्यात आली असता प्रचलित सन २०२१-२२ या वर्षाच्या राज्य दर सुचीनुसार प्राप्त निविदेतील दर हे कमी आहेत. त्यानुसार प्राप्त झालेले दर वाटाघाटी करणे कमी निविदा समितीपुढे ठेवण्यात आले. सदर दरांना मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या निविदा निवड समितीने दरवाटाघाटी केलेले दर मान्यतेसाठी शिफारस केली.

सदर कामांना निविदा निवड समितीने मंजूरी दिल्यानंतर सिमेंट कॉंक्रिट रोडच्या ९ कामांपैकी ६ कामांचा प्राप्त दरांचा गोषवारा निविदा निवड समितीने शिफारस केल्याप्रमाणे स्थायी समिती पुढे दि.०३.१२.२०२१ रोजी मंजूरीसाठी सादर करण्यात आला. त्यास स्थायी समिती सभेची मान्यता मिळाली आहे.

उर्वरित ३ कामांच्या तांत्रिक अर्हतेबाबत छाननी झाली आहे. प्राईज बिड उघडण्यात आलेली असून पुढील कार्यवाही सुरू आहे. सदर निविदाबाबत नियमानुसार कार्यवाही केलेली असून चालू राज्य दरसुचीतील दरापेक्षा मंजूर केलेल्या निविदेतील दर हे अंदाजपत्रकातील दरापेक्षा कमी असल्याने महानगरपालिकेचे कोणतेही नुकसान झाले नसल्याचे मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

* * * * * *

H/520-19

महाराष्ट्र विधानसभा

नगर विकास विभाग **लक्षवेधी सूचना**

सन २०२१ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

श्री. ज्ञानराज चौगुले, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मीरा-भाईंदर (जि.पालघर) महापालिकेच्या मल:निस्सारण केंद्राच्या उभारणीवर कोट्यावधी रुपये खर्च करण्यात येऊनही अद्यापपर्यंत बहुतांश मल:निस्सारण प्रकल्प बंद असल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास येणे, सदरहू महापालिके तर्फे भूमीगत गटार योजना आणि मल:निस्सारण केंद्र उभारणीसाठी ४९९ कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणे. तसेच त्यांच्या देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली भाईंदर पूर्व-पश्चिम परिसरात भूमीगत गटाराचे काम पूर्ण झालेले नसतानाही कागदोपत्री झाल्याचे दाखवून व खोटी माहिती देऊन कोट्यावधी रुपयांचा आर्थिक घोटाळा करण्यात येणे, सदरहू महापालिकेची दहा पैकी आठ मल:निस्सारण केंद्रे कार्यान्वीत असल्याची बनावट माहिती कागदोपत्री नमूद करण्यात येणे, प्रत्यक्षात मात्र सांडपाणी आवश्यक प्रकिया न करता गटार व नाल्यांमध्ये थेट खाडीपात्र तसेच समुद्रात सोडून नियमाचे उल्लंघन केल्याची बाब उघडकीस येणे, त्याचबरोबर शहरातील भाईंदर पश्चिम, इंद्रलोक, कनकिया, हटकेश, शांतीपार्क आणि शांतीनगर या ठिकाणचे मल:निस्सारण प्रकल्प अंशत: कार्यरत असून अद्यापही पूर्ण करण्यात न येणे, सदरहू प्रकल्पात महापालिकेचे संबंधीत अधिकारी, ठेकेदार यांनी आर्थिक संगनमत करुन व निकृष्ट बांधकाम करुन व काही ठिकाणी प्रत्यक्षात बांधकाम न करता कागदोपत्री दाखवून यामध्ये कोट्यावधी रुपयांचा आर्थिक घोटाळा करण्यात येऊन येथील नागरिकांना सांडपाणी व मल:निस्सारण केंद्राच्या सेवासुविधांपासून वंचित ठेवण्यात येणे, या संदर्भात संबंधीत अधिकारी यांना तात्काळ निलंबीत करुन त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक विभागा मार्फत चौकशी करण्याची मागणी, तसेच सदर काम करणाऱ्या ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने हस्तक्षेप व चौकशी करुन तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

मिरा भाईंदर महानगरपलिकेमार्फत भुयारी गटार योजना राबविण्यात येत असून सदर योजनेमध्ये एकुण ८९ कि.मी. मलवाहिनी टाकणे होते. परंतु प्रत्यक्षात ९२ मि. मलवाहिनी अंथरण्यात आलेली आहे. एकूण १० मलनि:सारण केंद्रापैकी ८ मलनि:स्सारण केंद्र कार्यान्वीत करण्यात आलेली आहेत. सदर योजनेच्या कामाची स्वीकृत निविदेची किंमत रु. ४९१.९६ कोटी (भाववाढ वगळता) असून त्यापैकी आजपर्यंत रु. ३९२.१३ कोटी (भाववाढ वगळता) खर्च झालेला आहे. मंजूर निविदेपेक्षा झालेला खर्च कमी आहे.

भाईंदर पुर्व व पश्चिमच्या काही परिसरामध्ये रस्ते अरुंद असून इमारती फार जुन्या झाल्या आहेत. सदर इमारतींचे फांऊडेशन हे फुटींगवर असल्याने संबंधीत परिसरातील मलनि:स्सारण वाहिनी ही भुयारी गटार योजनेतून वगळण्यात आलेली आहे.

मलनि:स्सारण केंद्रातून प्रक्रिया करुनच सांडपाणी सोडले जाते. भुयारी गटार योजनेतील मलनि:स्सारण केंद्रात मलप्रवाह घेऊन त्यावर शुध्दीकरण प्रक्रिया झालेल्या पाण्यावर प्रयोगशाळेत चाणणी केली जाते. चाचण्यांचे परिणाम प्रमाणीत मानकांनुसारच येतात. या पाण्याची महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत देखील चाचणी घेतली जाते. त्यात सुध्दा पाणी योग्य असेच आढळले. त्यामुळे याचा पर्यावरणास निश्चितच फायदा होत आहे. नियमानुसार ठेकेदाराने केलेल्या कामाचे देयक देण्यात येते. सदर योजनेचे ९८ टक्के काम पूर्ण झालेले आहे. मलनि:स्सारण वाहिनी अंथरतांना काही ठिकाणी आलेले अडथळे तसेच तांत्रिक अडचणीमुळे काही ठिकाणी जंक्शनचे काम शिल्लक होते. सदरच्या जंक्शनची कामे प्रगतीपथावर असून सदर कामे लवकरच पूर्ण करण्यात येतील.

भुयारी गटार योजनेचा कामाची गुणवत्ता उत्तम राखण्याकरीता महानगरपालिकेने PMC (Project Management Conusultancy) म्हणून मे. टंडन ॲड असोसिएटस यांची नेमणूक केली आहे. दैनंदिन कामावर देखरेख करणे, कामाची गुणवत्ता राखणे, गुणवत्तेसाठी आवश्यक असलेल्या सर्व तपासण्या करणे, इत्यादी कामे PMC करीत आहे.

भुयारी गटार योजनेच्या झालेल्या कामाची गुणवत्ता तपासून घेणेबाबत मिरा-भाईंदर महानगरपालिकेने IIT मुंबई यांची Third Party Inspection करणेकामी नेमणूक केली होती. योजनेच्या कार्यक्षेत्रावर जाणून कामाच्या गुणवत्तेबाबत तपासणी केली व त्यानुसार त्यांनी सदर योजनेचे काम समाधानकारक असल्याबाबतचा अहवाल सादर केलेला आहे.

भुयारी गटार योजनेच्या कामात दिरंगाई झाल्यामुळे ठेकेदार मे. एसपीएमएल इन्फ्रा लि. यांचेकडून रक्कम रू. ८.१६ कोटी इतके दंडणीय शुल्क वसुल करण्यात आले आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडून नागरिकांना खोटी माहिती देणे, आर्थिक घोटाळा करणे व नागरिकांना मलनि:स्सारण केंद्राच्या सेवासुविधांपासून वंचित ठेवणे अशी प्रत्यक्षात कोणतीही बाब नसल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

****

H/523-19

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

मा.श्री. अनिल भाईदास पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :

"राज्यातील सुमारे ८ ते १० हजार आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी १९ जिल्ह्यांमधील २१ सैनिकी शाळांमध्ये अध्यापनाचे कार्य माहे जुलै,२०२१ पर्यंत सुरळीत असणे, तथापि असे असतांना दि. १६ जुलै,२०२१ रोजी आदिवासी विकास विभागाने, सैनिकी शाळांमधील आदिवासी तुकड्या बंद करण्याचा व शिक्षकांचे वेतन देखील स्थगित करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला असल्याचे माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये निदर्शनास येणे, इतकेच नव्हेतर या शासन निर्णयामुळे राज्यातील बहुतेक सैनिकी शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांना इयत्ता ६ मध्ये प्रवेश दिला जात नसल्याचेही त्याच सुमारास निदर्शनास येणे, त्यामुळे शासनाने सदरचा दि. १६ जुलै,२०२१ रोजीचा शासन निर्णय मागे घ्यावा. अशी मागणी आदिवासी जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या विद्यार्थी व पालकांनी शासनाकडे माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, तथापि त्याप्रकरणी अद्याप शासन निर्णय मागे घेण्यात न आल्यामुळे राज्यातील आदिवासी विद्यार्थी व पालकवर्गामध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नैराश्याची भावना, परिणामी, आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता, सदरचा शासन निर्णय मागे घेण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे निवेदन

राज्यात शालेय शिक्षण विभागाने प्रत्येक जिल्ह्यात एक याप्रमाणे सैनिकी शाळा सुरु करण्याचा निर्णय दि. २६ सप्टेंबर, १९९५ च्या शासन निर्णयान्वये घेतला होता. सदर सैनिकी शाळांचा लाभ आदिवासी विद्यार्थ्यांना व्हावा या हेतुने सदर शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक इयत्तेची एक तुकडी सुरु करण्याचा निर्णय दि. २४.१२.२००७ च्या शासन निर्णयानव्ये घेण्यात आला. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदी विचारात घेवून सन २०२०-२१ पासून सैनिक

शाळेतील इ. ५ वी चे वर्ग बंद करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने दि. २४ एप्रिल,२०२० च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे.

आदिवासी विकास विभागाने सैनिक शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांसाठी तुकड्या ज्या हेतुने सुरु केल्या होत्या तो हेतु साध्य होत नसल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आल्याने विभागाने सैनिकी शाळांमधील आदिवासी विद्यार्थींची सुरु करण्यात आलेली स्वतंत्र तुकडी टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय घेतला. विभागाने दि. १६ जुलै,२०२१ च्या शासन निर्णयान्वये सैनिकी शाळांमधील आदिवासी विद्यार्थ्यांच्या तुकडीला अर्थसहाय्य २२०२ एच९७३, ३६-सहायक अनुदाने (वेतन) या लेखाशीर्षाखाली निधी वितरित करताना अशी अट नमूद केली होती की, विभागाने मागील वर्षापासून स्वतंत्र तुकडी रद्द करण्याचा निर्णय घेतला असल्याने इ. ५ वी व इ. ६ वी च्या शिक्षकांचे वेतन यामधून खर्ची टाकण्यात येवू नये. मात्र, या बंद केलेल्या तुकडीवरील शिक्षकांचे समायोजन करण्याची कार्यवाही शालेय शिक्षण विभागाकडून पूर्ण न झाल्याने शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे विभागाने दि. १७.०९.२०२१ च्या शासन निर्णयान्वये दि. १६.०७.२०२१ च्या शासन निर्णयातील, विभागाने मागील वर्षापासून स्वतंत्र तुकडी रद्द करण्याचा निर्णय घेतला असल्याने इ. ५ वी व इ. ६ वी च्या शिक्षकांचे वेतन यामधून खर्ची टाकण्यात येवू नये ही अट रद्द केलेली आहे.

सद्यस्थितीत राज्यातील सैनिकी शाळांमधील आदिवासी विद्यार्थ्यांसाठीच्या स्वतंत्र तुकड्या सुरु असून या तुकड्यांवरील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात आवश्यक निधी विभागाने उपलब्ध करुन दिलेला आहे. सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात या सैनिक शाळांमध्ये इ. ६ वी ते १२ वी या वर्गांमध्ये ६६१५ आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

गृह (परिवहन) विभाग

महाराष्ट्र विधानसभा
सन-२०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

सर्वश्री.देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (बच्चू) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुभाष देशमुख, राजेश पवार, राम कदम, राणाजगजीतसिंह पाटील, कुणाल पाटील, नानाभाऊ पटोले, सुरेश वरपुडकर, पृथ्वीराज चव्हाण, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री.अमीन पटेल, श्री.विकास ठाकरे, कुमारी प्रणिती शिंदे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री.बळवंत वानखडे, अमित झनक, सुभाष धोटे, हिरामण खोसकर, मोहनराव हंबर्डे, जितेश अंतापूरकर, माधवराव पवार, सुनील राणे, धिरज देशमुख, झीशान सिद्दिकी, विक्रमसिंह सावंत, त्रतुराज पाटील, रणजीत कांबळे, लक्ष्मण पवार, ॲड.राहुल ढिकले, सर्वश्री. विनोद निकोले, किसन कथोरे, गणपत गायकवाड, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री. संजय केळकर, प्रशांत ठाकूर, कुमार आयलानी, डॉ.बालाजी किणीकर,सर्वश्री.संतोष दानवे, अबु आजमी, राहूल कुल, जयकुमार गोरे, डॉ.भारती लव्हेकर, श्री.अतुल बेनके, श्रीमती नमिता मुंदडा, श्री.प्रमोद पाटील, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे.:-

"राज्यातील सर्वसामान्यांची विशेषत: ग्रामीण भागातील जनतेची जीवनवाहिनी असलेल्या एसटी मधील कर्मचाऱ्यांचा संप गेल्या सुमारे दीड महिन्यापासून सुरु असणे, पगार वाढीबरोबरच एसटीचे शासनामध्ये विलीनीकरण ही कर्मचाऱ्यांची एकमेव मागणी असणे, त्यासाठी राज्यभरात विविध ठिकाणी कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरु असणे, शासनाने वेतनवाढीचा प्रस्ताव दिलेला असणे तसेच प्रदीर्घकाळ संप सुरु असल्यामुळे मेस्मा लावण्याचा इशाराही दिलेला असणे, मात्र कर्मचारी विलीनीकरणाच्या मागणीवर ठाम असणे, तसेच कोरोना काळात मृत्यूमुखी पडलेल्या कर्मचाऱ्यांना अदयाप मदत न मिळणे, ५ % दिवाळीपूर्वी जाहिर केलेला बोनस रुपये २५०० अपूरा असणे, घर भाडे भत्ता देखील त्यांना नसणे, एसटी कर्मचाऱ्यांना केवळ २० ते २५ हजार पगार असणे, एसटी कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन आणि शासनातील कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतनामध्ये तफावत असणे, ५०० कोटी रुपये खर्च करुन एसटी बसमध्ये वायफाय सुविधा सुरु करुन देखील वायफाय यंत्रणा अनेक बसेसमध्ये नसणे, एसटीच्या या संपामुळे सर्वसामान्य जनतेला तसेच शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना दीड महिन्यांपासून नाहक त्रास सोसावा लागत असणे, या संपाचा फायदा घेऊन खाजगी प्रवास वाहतूक करणारे वाहतूकदार अव्वाच्या सव्वा दराने प्रवाशांकडून पैसे उकळत असणे, शासनाने एसटी कर्मचाऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अनेक प्रश्नांसंदर्भात लवकरात लवकर तोडगा काढण्याची व सामान्य जनतेच्या हाल-अपेष्टा संपवण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

नि वे द न
(ॲड.अनिल परब, मा.मंत्री (परिवहन))

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील संयुक्त कृती समितीच्या दि.१९.१०.२०२१ रोजीच्या पत्रान्वये आर्थिक व प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक होत नसल्याने दि.२७.१०.२०२१ पासून बेमुदत उपोषण करणार असल्याबाबत इशारा दिला होता. तसेच महाराष्ट्र राज्य कनिष्ठ वेतनश्रेणी एस.टी.कर्मचारी संघटनेने

रोटा / पच-५२८ (७००-१२-२०२१)

दि.२१.१०.२०२१ च्या पत्रान्वये रा.प.महामंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण करणे व प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणूकीकरीता दि.०३.११.२०२१ रोजीच्या मध्यरात्री पासून संप करण्याचा इशारा दिला होता.

या अनुषंगाने पत्र क्र. राप/मुकाअ/१५०८, दि.२७.१०.२०२१ अन्वये संयुक्त कृती समितीच्या पदाधिकारी यांना दि.२७.१०. २०२१ रोजीच्या उपोषणापासून परावृत्त होण्याबाबत तसेच चर्चेसाठी मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या दालनांत निमंत्रित करण्यात आले होते. या बैठकीमध्ये चर्चेअंती संयुक्त कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांचे समाधान न झाल्यामुळे ते उपोषणाच्या मतावर ठाम राहिले. तद्नंतर दि.२८.१०.२०२१ च्या पत्रान्वये मा. मंत्री परिवहन तथा अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांनी संयुक्त कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना मंत्रालयीन कक्षात बैठकीकरीता निमंत्रित करण्यात आले. मा.मंत्री परिवहन तथा अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांनी रा.प.कर्मचाऱ्यांना राज्य शासनाप्रमाणे २८% महागाई भत्ता व ८% , १६% व २४% घरभाडे भत्ता अशी वाढ जाहीर केली. वेतनवाढी संदर्भात दिवाळीनंतर याबाबत बैठक घेण्यात येईल असे मा.मंत्री परिवहन तथा अध्यक्ष,म.रा.मा.प.महामंडळ यांनी सांगितले तसेच दिवाळीपुर्वी रा.प.कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच दिवाळी भेट कर्मचारी / अधिकारी यांना अनुक्रमे रु.२५००/- व रु.५०००/- अदा करण्यात येईल, असे जाहीर केले. त्यानुसार रा.प.कर्मचा-यांना व अधिकाऱ्यांना एकूण रू.२३,०३,०५,०००/- इतकी रक्कम माहे नोव्हेंबर २०२१ मध्ये अदा करण्यात आली आहे. तद्नंतर संयुक्त कृती समितीमार्फत दि.२७.१०.२०२१ रोजी पासून सुरु केलेले बेमुदत उपोषण मागे घेवून वाहतूक सुरु करण्याचे जाहीर केले. या अनुषंगाने दि.०१.११.२०२१ रोजी रा.प.कामगारांना घोषित केल्याप्रमाणे महागाई व घरभाडे भत्त्यानुसार वेतन अदा करण्यात आले आहे.

दि.२८.१०.२०२१ पासून रा.प.महामंडळातील काही कर्मचाऱ्यांनी उत्स्फुर्तपणे संप / कामबंद आंदोलन सुरु केले होते. संयुक्त कृती समितीमार्फत घेण्यात आलेला निर्णय मान्य नसल्यामुळे त्यांनी टप्प्याटप्याने आगाराचे कामकाज बंद पाडले. दि.२९.१०.२०२१ रोजी मा. औद्योगिक न्यायालय, मुंबई यांनी तक्रार युएलपी क्र.२१७/२०२१ या प्रकरणात रा.प.कर्मचाऱ्यांना संपावर जाण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे, असे आदेश पारित केले. या आदेशाची प्रत सर्व संघटनांना पाठविण्यात आली आहे. याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट पिटीशन क्र. २१६९९/२०२१ या प्रकरणांत दि.०३.११.२०२१ रोजी निदर्शने/ संप/ कामबंद करण्यास प्रतिबंध करण्याचे निर्देश दिले. परंतु रा.प.कर्मचारी आपल्या मतावर ठाम राहून सदरचे संप / कामबंद आंदोलन सुरु ठेवले आहे.

अध्यक्ष / सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य कनिष्ठ वेतनश्रेणी एस.टी. कर्मचारी संघटना यांना संपापासून परावृत्त होण्याबाबत पत्र क्र. राप/ मुकाअ/ १५२९, दि.०२.११.२०२१ अन्वये विनंती करण्यात आली होती. तसेच संपापासून परावृत्त होवून दिवाळी असल्याने वाहतूक सुरु करावी, अशी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी विनंती केली होती. महाराष्ट्र राज्य कनिष्ठ वेतनश्रेणी एस.टी. कर्मचारी संघटना यांनी त्यांचे पत्र क्र. मकवेंस.१९९/११/२०२१, दि.०३.११.२०२१ अन्वये राज्य शासनाकडून विलीनीकरण संदर्भात लेखी आश्वासनाची पुर्तता होत नाही तोपर्यंत संप चालूच राहील, असे संघटनेमार्फत सर्व कर्मचारी / अधिकारी व संघटनेच्या पदाधिकारी यांना कळविण्यात आले. महाराष्ट्र राज्य कनिष्ठ वेतनश्रेणी एसटी कर्मचारी संघटना व

संघर्ष संघटना यांनी दि.०४.११.२०२१ पासून संपाची नोटीस दिली. त्याविरुध्द रा.प.महामंडळाचे वतीने मा.उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र.२१६९९/२०२१ दाखल करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने दि.०३.११.२०२१ रोजीच्या सुनावणीत मा.उच्च न्यायालयाने रा.प.महामंडळाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी दि.०३.११.२०२१ रोजीच्या मध्यरात्री रॅली/संप/कामबंद आंदोलन पासून परावृत्त व्हावे असे आदेश दिले.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट पिटीशन क्र. २१६९९/२०२१ या प्रकरणांत दि.०८.११.२०२१ रोजी म.रा.मा.प.महामंडळाच्या कर्मचा-यांना राज्यशासकीय कर्मचारी समजण्यात यावे, या मागणीचा विचार करण्यासाठी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, अपर मुख्य सचिव (वित्त) व अपर मुख्य सचिव (परिवहन) यांची त्रिसदस्यीय समिती गठीत करण्याचे आदेश दिले. या आदेशानुसार राज्य शासन निर्णय क्र. एसटीसी-११२१/ प्र.क्र.३०२/ परि-१, दि.०८.११.२०२१ अन्वये शासन निर्णय काढून समिती गठीत करण्यात आली. या समितीची पहिली बैठक दि.०८.११.२०२१ रोजी दुपारी ४.०० वाजता घेतली आणि बैठकीचे कार्यवृत्त व शासन निर्णय मा. उच्च न्यायालयात सादर करण्यात आले. तरीही याबाबत महाराष्ट्र राज्य कनिष्ठ वेतनश्रेणी एस.टी. कर्मचारी संघटना हे आपल्या संप /कामबंद आंदोलनावर ठाम राहीले.

दिनांक ०३.११.२०२१ रोजी संप /मोर्चा व कामबंद आंदोलन करण्यास मा.उच्च न्यायालयाने मनाई करुन तसेच दि.०८.११.२०२१ रोजी कर्मचारी संघटनांची, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचा-यांना राज्य शासकीय कर्मचारी म्हणून समजण्यात यावे, या मागणीवर विचार करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन करुन सुध्दा संप मागे घेतला न गेल्याने महामंडळाने दि.१०.११.२०२१ रोजी अवमान याचिका क्र.२१७५८/२०२१ मा.उच्च न्यायालयात दाखल केली आहे.

दि.२०.११.२०२१ रोजी मा.मंत्री,परिवहन तथा अध्यक्ष,म.रा.मा.प. महामंडळ यांच्यासमवेत त्यावेळी संपकरी कामगाराचे नेतृत्व करत असलेले मा.आमदार श्री.सदाभाऊ खोत व कामगार प्रतिनिधींसह कामगारांच्या वेतनवाढीबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली. या चर्चेअंती संपावर यशस्वी तोडगा काढण्यासाठी मा.आमदार सदाभाऊ खोत यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

दि.२४.११.२०२१ रोजी मा.मंत्री,परिवहन तथा अध्यक्ष,म.रा.मा.प. महामंडळ यांच्यासमवेत मा.आमदार, श्री.सदाभाऊ खोत आणि श्री.गोपीचंद पडळकर, विधान परिषद सदस्य आणि कामगार प्रतिनीधी यांच्यासह कामगारांच्या प्रश्नांबाबत व वेतनवाढीबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली.

या चर्चेअंती असे ठरविण्यात आले की, महामंडळातील कर्मचाऱ्यांचे वेतन इतर राज्यांतील परिवहन महामंडळाच्या वेतनाशी मिळते-जुळते करण्याच्या दृष्टीने तसेच नविन लागलेल्या कर्मचाऱ्यांचे सुरुवातीचे वेतन हे कमी असल्यामुळे त्यांच्या वेतनात भरीव वाढ करणे आवश्यक होते. त्यादृष्टीने नवनियुक्त ते १० वर्षे सेवा पूर्ण करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्या मुळ वेतनात रु.५०००/-, १० वर्षे १ दिवस ते २० वर्षे सेवा पूर्ण करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्या मुळ वेतनात रु.४०००/- व २० वर्षांपेक्षा अधिक सेवा झालेले अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मुळ वेतनात रु.२५००/- इतकी वाढ देण्यात यावी. त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या वार्षिक

वेतनवाढीचा दरही २ टक्केवरुन सुधारित करुन राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे ३ टक्के इतका करण्यात यावा.

वरीलप्रमाणे वेतनवाढ मा.श्री.सदाभाऊ खोत, विधानपरिषद सदस्य, मा.श्री.गोपीचंद पडळकर, विधानपरिषद सदस्य व कामगार प्रतिनिधींनी मान्य केली. त्याप्रमाणे कामगारांना संप मागे घेण्याचे आवाहन श्री.सदाभाऊ खोत, विधानपरिषद सदस्य व श्री.गोपीचंद पडळकर, विधानपरिषद सदस्य व मा.मंत्री (परिवहन) यांच्या दिनांक २४.११.२०२१ रोजीच्या संयुक्त पत्रकार परिषदेमध्ये करण्यात आले. तथापी कामगारांनी त्यांच्या आवाहनास प्रतिसाद न देता संप सुरुच ठेवला. महामंडळाने दिनांक ०१.१२.२०२१ रोजी परिपत्रक काढून वरीलप्रमाणे कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देण्याचे निर्देश दिले. त्यानुसार माहे नोव्हेंबर २०२१ देय डिसेंबर २०२१ मध्ये देय होणारे वेतन वरीलप्रमाणे वाढीसह दिनांक ०७.१२.२०२१ रोजी कामावर असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आले. या वाढीमुळे महामंडळावर सुमारे रु.६० कोटी इतका मासिक बोजा पडला आहे. कोव्हिड-१९ व संप यामुळे झालेली महामंडळाची आर्थिक स्थिती लक्षात घेता, कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी महामंडळाकडे निधी उपलब्ध नसल्याने, कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी आवश्यक निधी शासनातर्फे वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

संपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय बाब म्हणून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. तथापि, जे कर्मचारी कामावर येण्यास तयार आहेत त्यांना दि.१३.१२.२०२१ पर्यंत कामावर रुजू करुन घेण्यासाठी निलंबनासारखी अप्रिय कारवाई मागे घेण्याबाबत रा.प.महामंडळाने महत्वाचा निर्णय घेतला आहे. या संधीचा लाभ घेऊन निलंबीत कर्मचाऱ्यांनी मुख्य प्रवाहात सामील व्हावे. जेणेकरुन संबंधितांना भविष्यात कायदेशीर कारवाईचा सामना करावा लागणार नाही, अशा सुचना परिपत्रक क्र.राप/आस्था/प्रशा/३३२-ए/५३२८, दि.१०.१२.२०२१ अन्वये प्रसारित करण्यात आल्या. "संपामुळे ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता, शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी, जेष्ठ नागरिक आदिंना नाहक त्रास होत आहे. त्यांना एस.टी.ची सेवा मिळावी यासाठी आम्ही बांधिल आहोत, प्रवाशी हे आपले ग्राहक आहेत. हा ग्राहक आपल्यापासून तुटू नये, यासाठी कर्मचाऱ्यांनी समजूतदारपणा दाखवून संप मागे घ्यावा" असे पुन्हा आवाहन मा.मंत्री (परिवहन) तथा अध्यक्ष म.रा.मा.प. महामंडळ यांनी केले आहे. परंतु या आवाहनास कर्मचाऱ्यांनी प्रतिसाद दिला नाही. दि.१३.१२.२०२१ पर्यंत २१३७० इतके कर्मचारी कामावर हजर होते. मात्र ६८१७८ कर्मचारी संपात सहभागी होते.

दि.२०.१२.२०२१ पर्यंत संपावर गेलेल्या १०८१८ रा.प. कर्मचाऱ्यांवर निलंबानाची कार्यवाही व २०५८ रा.प.कर्मचाऱ्यांची सेवा समाप्तीची कारवाई करण्यात आली आहे. मेस्मा अंतर्गत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

मा.मंत्री (परिवहन) तथा अध्यक्ष म.रा.मा.प.महामंडळ यांनी संपाची नोटीस देणाऱ्या महाराष्ट्र राज्य कनिष्ठ वेतनश्रेणी एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष अजयकुमार गुजर यांच्यासह शिष्टमंडळाला दि.२०.१२.२०२१ रोजी चर्चेसाठी बोलावले होते. मा.मंत्री (परिवहन) यांच्या मंत्रालयीन दालनात सदर बैठक पार पडली. मा.मुंबई उच्च न्यायालयाने विलीनिकरणाच्या मागणी संदर्भात नेमलेल्या त्रिसदस्य समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर तो शासन आणि संघटनेला मान्य राहिल. त्यामुळे हा अहवाल प्राप्त होईपर्यंत कर्मचाऱ्यांच्या

अन्य मागण्याबाबत चर्चा करण्याची प्रशासनाची तयारी आहे, अशी भुमिका मा.मंत्री (परिवहन) तथा अध्यक्ष म.रा.मा.प.महामंडळ यांनी मांडली. चर्चेदरम्यान संघटनेच्या शिष्ट मंडळाने विलीनिकरणाचा मुद्दा न्यायालयाने नेमलेल्या समितीच्या कक्षेत असल्यामुळे तो सोडून कर्मचाऱ्यांच्या अन्य मुद्यावर शासनाने तातडीने बैठक घेऊन मार्ग काढावा, अशी आग्रही भूमिका मांडली. त्यानंतर चर्चेमध्ये सर्वानुमते असे ठरले की, अध्यक्ष सरचिटणीस महाराष्ट्र राज्य कनिष्ठ वेतनश्रेणी यांनी दि.२०.१२.२०२१ रोजीच्या मध्यरात्रीपासून संप मागे घेण्याचे संपकरी कर्मचाऱ्यांना आवाहन करावे. दि.२२.१२.२०२१ पर्यंत जे आगार चालू होतील, त्या आगारातील कर्मचाऱ्याविरुध्दच्या निलंबन, बडतर्फी, सेवा समाप्ती व बदल्या यासारख्या कारवाया मागे घेण्यात येतील. तसेच फौजदारी कारवाईची प्रकरणे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन मागे घेण्यात येतील. संपकरी कामगाराचे नेतृत्व करणारे कनिष्ठ वेतनश्रेणी एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष श्री.अजयकुमार गुजर यांनी संप मागे घेत असल्याचे जाहिर केले व कामगारांनी कामावर रुजू होण्याचे आवाहन केले. सदर आवाहनास कामगारांकडून अद्याप फारसा प्रतिसाद मिळाला नाही.

दि. २७.१०.२०२१ पासून रा.प. महामंडळाच्या कर्मचा-यांनी शासनात विलिनीकरण या मागणीसाठी संप केला असून दि.२८.१०.२०२१ पासून टप्प्या-टप्प्याने रा.प. महामंडळाचे आगार बंद होत गेले. दि. १०.११.२०२१ पासून ते दि. २५.११.२०२१ पर्यंत पूर्ण आगार बंद होते. त्यानंतर दि. २६.११.२०२१ पासून टप्प्या-टप्प्याने वाहतूक चालू होऊन दि. २१.१२.२०२१ रोजी १३४ आगार अंशत: सुरु आहेत. दि. २१.१२.२०२१ रोजी २९१६ फे-या चालविण्यात येत आहेत. रा.प. महामंडळाची दैनंदिन वाहतूक सुरळीत चालू असताना रा.प. बसद्वारे सरासरी ९५,००० फे-याद्वारे ६६ लाख प्रवाश्यांची वाहतूक होते. संप आंदोलनामुळे फक्त सरासरी २९०० फे-या चालू असून २ लाख प्रवाश्यांची वाहतूक होते. त्यामुळे प्रवाश्यांची / विद्यार्थ्यांची गैरसोय होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

रा.प. कर्मचाऱ्यांच्या संपाचा फायदा घेवून खाजगी प्रवासी वाहतूकदारांनी प्रवाशांकडून जास्त प्रमाणात पैसे उकळले याबाबतची माहिती रा.प.महामंडळाशी संबंधीत नाही.

कोविड-१९ संबंधित कर्तव्य बजावतांना ३०३ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला आहे. शासन निर्णय क्र.संकीर्ण२०२०/प्र.क्र.४/व्याय-९ दि.२९ मे,२०२० सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने रा.प.महामंडळाने परिपत्रक क्र.१३/२०२० दि.०१.०६.२०२० अन्वये कोविड-१९ संबंधित कर्तव्य बजावतांना कोविडमुळे मृत होणाऱ्या परिचालनाशी संबंधित रा.प.महामंडळातील चालक, वाहक, चालक तथा वाहक, स्थानकावरील प्रत्यक्ष प्रवाशांच्या संपर्कात येणारे वाहतूक नियंत्रक, सहा.वाहतूक निरीक्षक तसेच सुरक्षा रक्षक कर्मचाऱ्यांना अटी व शर्तीच्या अधिन राहून रु.५० लाखाचे विमा कवच/सानुग्रह सहाय्य सदर योजनेची पत्र १० कर्मचाऱ्यांच्या वारसांना देण्यात आले आहे. ज्या मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना सदर योजनेअंतर्गत लाभ मिळू शकत नाही. अशा कर्मचाऱ्यांना मा.मंत्री परिवहन तथा अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांनी दि.०१.०६.२०२१ रोजी रा.प.महामंडळ वर्धापन दिनाच्या निमित्त रु.५,००,०००/- आर्थिक मदत घोषित केली आहे. याबाबत कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३२/२०२१ दि.३०.०९.२०२१ अन्वये सर्व विभाग/घटकांना सूचना प्रसारित करण्यात आल्या आहेत. सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने कागदपत्राची पुर्तता झालेल्या एकुण ६९ प्रकरणापैकी

६७ प्रकरणांची देयके मृत कर्मचाऱ्यांचे वारसांना अदा करण्यात आली आहेत. उर्वरित प्रकरणात वारसांचा तपशील घेऊन प्रदानाची कार्यवाही सुरु आहे.

रा.प. महामंडळाच्या बसेसमधून प्रवाशांना त्यांच्या वायफाय (बिनतारी स्थानीक संगणकीय जाळे) युक्त स्मार्टफोन मधून हॉटस्पॉटच्या माध्यमातून (इंटरनेटचा वापर न करता) मोफत मनोरंजनात्मक सुविधा प्राप्त करुन देण्याची योजना राबविण्यासाठी सेवापुरवठादार मे.यंत्रा डिजीटल सर्व्हिसेस प्रा.लि.मुंबई यांचेशी दि.०६.०२.२०१७ रोजी करार करण्यात आला होता. त्यानुसार सेवापुरवठादार मे.यंत्रा डिजीटल सर्व्हिसेस प्रा.लि.मुंबई यांनी रा.प. महामंडळाकडे सुरक्षा अनामत रक्कम रु. ५२,५०,०००/- व बँक हमी रु.२६,२५,०००/- जमा केली होती. रा.प. महामंडळाच्या सुमारे १२६०० बसेसमध्ये सदर वायफाय यंत्रणा बसविण्यात आली असून सदर प्रकल्पासाठी रा.प.महामंडळाने कोणत्याही प्रकारचा खर्च केलेला नाही. याउपर रा.प. महामंडळास सदर प्रकल्पाद्वारे वार्षिक परवाना फी च्या माध्यमातून प्रति वर्ष रु.१.०५ कोटी इतका अतिरीक्त महसूल प्राप्त झाला आहे. दरम्यानच्या कालावधी मध्ये काही खाजगी दूरसंचार कंपन्यांनी अत्यल्प दरात इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन दिल्याने रा.प. महामंडळाच्या वायफाय योजनेस प्रवांशांचा प्रतिसाद अत्यंत कमी प्रमाणात मिळत होता. त्यामुळे सेवा पुरवठादार कंपनीस सदर सेवा सुरु ठेवणे आथिर्क दृष्टया अवघड झाल्याचे तसेच यापुढे राप महामंडळास वार्षिक परवाना शुल्क देणे शक्य नसल्याचे सेवा पुरवठादार यांनी पत्राद्वारे कळविले होते. सदर परिस्थिती विचारात घेता रा.प. व्यवस्थापनाकडून एस.टी. मधिल वायफाय सेवा माहे जून २०१९ पासून बंद करण्यात आली असून सेवा पुरवठादार मे.यंत्रा डिजीटल सर्व्हिसेस प्रा.लि.मुंबई यांनी रा.प. महामंडळाकडे जमा केलेली सुरक्षा अनामत रक्कम रु.५२,५०,०००/- व बँक हमी रु.२६,२५,०००/- जप्त करण्यात आली आहे.

*****

सन-२०२१ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.३७९

श्री. प्रकाश फातर्पेकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.३७९ खालीलप्रमाणे आहे :-

"न्यू अश्विनी को-ऑ.हौ.सोसायटी मर्यादित ५१ टीपीएस मार्ग, बाभई, बोरिवली पश्चिम, मुंबई या संस्थेच्या तत्कालिन कार्यकारी मंडळाने विकासक मे. एम.पी.स्पेस डायनॅमिक्स यांच्या संगणमताने सन २०१५ मध्ये पुनर्विकास प्रस्ताव सादर करताना दिनांक ३ जानेवारी, २००९ रोजीच्या शासन निर्णयातील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७९ (अ) च्या निदेशांची पायमल्ली करणे, उक्त संस्थेतील सभासदांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम २२ व २३ अन्वये उपनिबंधक यांचेकडे केलेल्या दाव्यांच्या सुनावणीबाबत सभासदांची दिशाभूल करुन दावे प्रलंबित ठेवून अंतिम निर्णय देण्यास जाणूनबुजून विलंब करण्यात येणे, उक्त संस्थेवर निबंधकांमार्फत नेमण्यात आलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याच्या नियुक्तीस संस्थेचे सभासद नसलेल्या व्यक्तींनी आक्षेप घेतल्यामुळे उपनिबंधक, सहकारी संस्था, आर- नॉर्थ विभाग, मुंबई यांचेमार्फत दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ रोजी कोणतीही शहानिशा न करता नव्याने नेमण्यात आलेल्या प्राधिकृत अधिकारी मंडळाच्या नियुक्तीसंदर्भात संस्थेतील सभासदांनी दिनांक २४ सप्टेंबर, २०२१ रोजी लेखी तक्रार केल्यानंतर सभासदांच्या दाव्यांबाबत निर्णय देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करणे, या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन

न्यु अश्विन को. ऑ. हौ. सो. मर्या., या संस्थेच्या कार्यकारी मंडळाने संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत दि. १६/१०/२०१५ रोजी दाखल केलेला प्रस्तावास अनुसरुन उपनिबंधक, सहकारी संस्था, आर- नॉर्थ विभाग, मुंबई कार्यालयाने संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेसाठी सहकारी अधिकारी श्रेणी-२ यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९(अ) अन्वये व दि.०३/०१/२०००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार संस्थेच्या इमारतीच्या पुर्नविकासाबाबत संस्थेच्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा दि.१८/१०/२०१५ रोजी आयोजित केलेली होती. सदर सभेस संस्थेच्या एकूण ३१ सभासदापैकी २८ सभासद उपस्थित होते. सदर सभेस उपस्थित २८ पैकी २८ सभासदांनी मेसर्स एम. पी. स्पेस डायनामीक्स प्रा. लि., यांची विकासक म्हणून निवड केलेली आहे. २८ सदनिकाधारंकानी मेसर्स एम. पी. स्पेस डायनामिक्स प्रा. लि. यांना संस्थेच्या इमारतीच्या पुर्नविकासास विकासक म्हणून लेखी संमती दिलेली आहे. त्यानुसार उपनिबंधक, सहकारी संस्था, आर- नॉर्थ विभाग, मुंबई कार्यालयाने दि. ०५/११/२०१५ रोजीच्या पत्रान्वये नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

याप्रकरणी न्यू अश्विन को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. या संस्थेतील तीन व्यक्ती श्री. बिपीन जनार्दन चव्हाण यांनी दि.०८/०२/२०२१ रोजी व श्री. मिलींद मनोहर सेनजित यांनी दि.०२/०८/२०२१ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २२(२) अन्वये तसेच, श्री. साबिन सदानंद बांदेकर यांनी दि.२६/०७/२०२१ रोजी कलम २३ (२) अन्वये उपनिबंधक, सहकारी संस्था, आर- नॉर्थ विभाग, मुंबई यांच्याकडे अपील दाखल केलेले आहे.

उपनिबंधक, सहकारी संस्था, आर- नॉर्थ विभाग, मुंबई यांनी श्री. बिपीन जनार्दन चव्हाण यांच्या अपीलामध्ये दि.१०/११/२०२१ रोजी निर्णय दिलेला असून, अपील मंजूर करण्यात आलेले आहे. श्री. मिलींद

मनोहर सेनजीत व श्री. साबीन सदानंद बांदेकर यांचे अपिल सुनावणीअंती दि.२२/११/२०२१ रोजी निकालासाठी बंद करण्यात आले होते. दि.३०/११/२०२१ रोजीच्या आदेशान्वये श्री. मिलिंद सेनजीत यांचे अपील मंजूर करुन कलम १५४ब १३ मधील तरतूदीनुसार त्यांना प्रोव्हिजनल मेंबरशिप दिलेली आहे. तसेच दिनांक ३०/११/२०२१ रोजीचे आदेशान्वये श्री. साबीन बांदेकर यांचे अपील निष्फळ (infructuous) झाल्याने निकाली काढलेले आहे. सदर प्रकरणी कोणाताही विलंब झालेला नाही. कोव्हीड-१९ प्रादुर्भावामुळे साधारण साडेचार महिने सुनावणी कामकाज करता आले नाही. शासकीय आदेशानुसार कोव्हिड-१९ प्रार्दुभावामुळे शासकीय कार्यालयामध्ये अभ्यांगतांना असलेली प्रवेश बंदी, गर्दी टाळण्याच्या दृष्टीने सुनावणी कामकाजास आलेल्या मर्यादा व लॉकडाऊनमुळे सुनावणी कामकाज न करता आल्याने उर्वरित कालावधीमध्ये सुनावणी प्रकरणाची वाढलेली संख्या या सर्व परिस्थितीमध्ये वरील अपीलामध्ये सुनावणी घेऊन गुणवत्तेवर निर्णय दिलेले आहेत. यामध्ये कोणताही विलंब झालेला नाही.

तसेच याप्रकरणी श्री. साबीन बांदेकर यांचे दि.२२/१२/२०२० रोजीच्या स्वतंत्र तक्रार अर्जानुसार अर्जदार व संस्था यांना सुनावणीची संधी दिलेली आहे. सदर सुनावणी दरम्यान अर्जदार श्री. साबीन एस. बांदेकर व इतर दोन यांनी संस्थेच्या व्यवस्थापक समितीचा कालावधी दि.२४/०८/२०१८ रोजी संपलेला असल्याने व्यवस्थापक समिती बरखास्त करुन प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्याची मागणी केलेली होती. त्यानुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) (ब-१) अन्वये उपनिबंधक, सहकारी संस्था, आर- नॉर्थ विभाग, मुंबई यांच्या दि.१८/०२/२०२१ रोजीच्या आदेशाद्वारे संस्थेची व्यवस्थापक समिती बरखास्त करुन प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

तद्नंतर याबाबत श्री. कश्यप एच. राजगोर व इतर २७ सभासद यांनी दि.२९/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये संस्थेवर नियुक्त प्राधिकृत अधिकारी यांचे ऐवजी संस्थेचे सभासद श्री. महेंद्रा खरात, श्री. अतुल गोविंद विरकर व श्री. विजय एस सोनी या सभासदांचे प्राधिकृत अधिकारी मंडळ नियुक्त करण्याची मागणी उपनिबंधक, सहकारी संस्था, आर- नार्थ विभाग, मुंबई यांच्याकडे केलेली आहे. त्याअन्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७७(अ) (४) अन्वये प्राधिकृत अधिकारी यांचे ऐवजी संस्थेच्या सभासदांचे प्राधिकृत अधिकारी मंडळ दिनांक १६/०९/२०२१ रोजी आदेशान्वये नियुक्त केले आहे.

त्याविरुद्ध श्री. बिपीन चव्हाण व श्री. साबीन बांदेकर यांनी दिनांक २४/०९/२०२१ रोजी उक्त प्राधिकृत अधिकारी मंडळ नियुक्तीबाबत तक्रार दाखल केलेली आहे. याबाबत स्वतंत्रपणे सुनावणी देण्याची आवश्यकता नाही, असे उपनिबंधक, सहकारी संस्था, आर- नॉर्थ विभाग, मुंबई यांनी कळविले आहे.

उपरोक्त दि.१६/०९/२०२१ रोजीचे आदेशाविरुध्द श्री बिपीन जे चव्हाण व इतर यांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांच्याकडे रिव्हीजन अपिल क्रं.३२९/२०२१ दाखल केलेले आहे. याबाबत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई यांनी दि.२५/११/२०२१ रोजीच्या आदेशान्वये उपनिबंधक, सहकारी संस्था, आर नॉर्थ, मुंबई यांच्या दि.१६/०९/२०२१ रोजीच्या आदेशास स्टेटस को दिलेला असून, प्राधिकृत अधिकारी मंडळास धोरणात्मक निर्णय न घेण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

****